




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

गुरुवार, दि. १३ नोव्हेंबर २०२५








मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४ थे | अंक : ००४ | किंमत : ४.00 रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com | Gmail : punegavkari@gmail.com


# पक्ष चिन्हाचा फैसला निवडणुकीनंतर

## शिवसेना, राष्ट्रवादीच्या फुटीवर २१ जानेवारीला अंतिम सुनावणी

**मुंबई, नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**

शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे पक्षनाव व निवडणूक चिन्हावर सर्वोच्च न्यायालयात २१ जानेवारीला अंतिम सुनावणी घेण्यात येणार आहे. न्यायमूर्ती सूर्य कांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठाने या याचिकांवरील सुनावणी सकाळी साडेअकरा वाजता निश्चित केली असून त्या दिवशी अन्य कोणतेही कामकाज आपल्यापुढे न ठेवण्याची सूचना खंडपीठाने न्यायालय निबंधकांना केली. ही सुनावणी लांबणीवर पडल्यामुळे शिवसेनेच्या ठाकरे गटाचा बुधवारी हिरमोड झाला. शिवसेना व राष्ट्रवादीच्या याचिकांवर २१ जानेवारीला दिवसभर सुनावणी घेऊन गरज भासल्यास दुसऱ्या दिवशीही सुनावणी घेतली जाईल, असेही खंडपीठाने स्पष्ट केल्याने शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीमुळे निर्माण झालेल्या पक्षनाव व निवडणूक चिन्हाच्या वादावर जानेवारी अखेरीपर्यंत निर्णय येण्याची शक्यता आहे. सर्वोच्च न्यायालयाने ३१ जानेवारीपर्यंत राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची प्रक्रिया पूर्ण करण्याचा आदेश दिला आहे. पहिल्या टप्प्यात नगरपालिकांच्या निवडणुकांची प्रक्रिया सुरू झाली आहे. परिणामी २१ जानेवारीपूर्वी मुंबई, ठाण्यासह सर्व महानगरपालिकांच्या निवडणुकांची प्रक्रिया पूर्ण होण्याची शक्यता वर्तविला जाते. यामुळेच सर्वोच्च न्यायालयात चिन्हाचा वाद सुनावणीस येईल तोपर्यंत शिवसेना ठाकरे आणि राष्ट्रवादी शरद पवार गटासाठी महत्त्वाच्या असलेल्या निवडणुका पूर्ण झाल्या असण्याची शक्यता अधिक आहे.




राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होत असल्याने निवडणूक चिन्हाच्या प्रकरणावर तातडीने सुनावणी घेण्याची मागणी ठाकरे गटाचे वतीने वकील देवदत्त कामत यांनी केली. जानेवारी अखेरपर्यंत महापालिकेच्या निवडणुकाही पार पडतील. त्यातही मुंबई-ठाणे या महापालिका निवडणुका ठाकरे गटाप्रमाणे शिंदे गटासाठीही महत्त्वाच्या आहेत. लोकसभा व विधानसभा निवडणुकीत शिंदे गटाने धनुष्य-बाण या निवडणूक चिन्हाचा वापर केला होता. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये त्याचा वापर केला जाऊ नये, यासाठी ठाकरे गट आग्रही होता. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी निवडणूक चिन्ह नोव्हेंबर अखेरीस निश्चित होणार आहे. त्यापूर्वी सर्वोच्च न्यायालयात या प्रकरणाचा अंतिम निकाल लागणे ठाकरे गटाला अपेक्षित होते. मात्र, आता ही सुनावणी जानेवारीमध्ये होणार असल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत शिंदे गटाला धनुष्य-बाणाचा वापर करता येऊ शकेल.

### युक्तिवादासाठी तीन तासांचा कालावधी

न्या. सूर्य कांत यांनी शिवसेना-ठाकरे गट व राष्ट्रवादी काँग्रेस-शरद पवार गट यांच्या वकिलांना युक्तिवादासाठी तीन तासांचा कालावधी दिला असून शिवसेना शिंदे गट व राष्ट्रवादी काँग्रेस-अजित पवार गटाच्या वकिलांना दोन तासांचा वेळ देण्यात आला आहे. २१ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता अंतिम सुनावणी सुरू होईल व पाच तासांमध्ये दोन्ही बाजूंचा युक्तिवाद संपेल. गरज असेल तर २२ जानेवारी रोजीही ही सुनावणी सुरू राहील, असे निर्देश न्या. सूर्य कांत यांनी दिले.

## आता बोला...




## सौ. सीमा मठकर आज ठाकरे शिवसेनेत प्रवेश करून अर्ज दाखल करणार

**सावंतवाडी : (समर्थ गांवकरी)**

जनता दलाच्या सौ. सीमा मठकर या आज गुरुवारी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षात प्रवेश करणार असून, त्यानंतर नगराध्यक्षपदासाठी त्यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यात येणार आहे, अशी माहिती शिवसेना विधानसभा प्रमुख रूपेश राऊळ यांनी दिली. सावंतवाडी नगर परिषदेच्या नगराध्यक्ष पदाच्या जागेसाठी सौ. सीमा मठकर यांचा उमेदवारी अर्ज उद्या दाखल होणार आहे. तत्पूर्वी, माजी खासदार विनायक राऊत, जिल्हा संपर्कप्रमुख अरुण दुधवडकर, आणि माजी आमदार वैभव नाईक यांच्या उपस्थितीत त्यांचा पक्षप्रवेशाचा कार्यक्रम होणार आहे. सावंतवाडी शहराचा विकास डोळ्यासमोर ठेवून ही निवडणूक महाविकास आघाडीच्या माध्यमातून लढवण्यासाठी शिवसेना प्रयत्नशील असल्याचे श्री. राऊळ यांनी स्पष्ट केले. "तशा प्रकारचे प्रयत्न शेवटपर्यंत आमचे राहणार असून, पूर्ण ताकदीनिशी या निवडणुकीला सामोरे जाण्याची तयारी आमच्याकडून सुरू आहे," असे ते म्हणाले.

## सिंधुदुर्गात महायुतीची चर्चा, बंडखोरी रोखण्यासाठी प्रयत्न!

**सावंतवाडी : (समर्थ गांवकरी)**

रत्नागिरी जिल्ह्यात भारतीय जनता पक्ष (भाजप), शिवसेना (शिंदे गट) आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस (राष्ट्रवादी) महायुतीचे धोरण निश्चित झाले असले तरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात मात्र यावर अजूनही चर्चा सुरू आहे. यामुळे नगराध्यक्ष आणि नगरसेवक पदासाठी इच्छूक असलेल्या उमेदवारांमध्ये मोठी खदखद आणि अनिश्चितता निर्माण झाली आहे. महायुती झाल्यास असंख्य इच्छुकांची भूमिका काय असेल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

महायुतीच्या चर्चेला गती मिळाली असतानाच, दुसरीकडे कणकवली नगरपंचायत निवडणुकीसाठी भाजप आज प्रचाराचा नारळ फोडणार आहे. यामुळे महायुतीच्या धोरणाआधीच भाजपने आपली तयारी सुरू केल्याचे दिसून येत आहे.



सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी, वेंगुर्ले आणि मालवण नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीसाठी महायुतीतील घटक पक्षांचे उमेदवार अर्ज दाखल करतील आणि महायुती झाल्यास माघार घेतील असा एक मतप्रवाह असल्याची चर्चा आहे. बंडखोरी रोखण्यासाठी आणि कोणत्याही परिस्थितीत ठाकरे शिवसेनेचा पराभव करण्याच्या उद्देशाने हा प्रयत्न सुरू असल्याचे बोलले जात आहे. मात्र, आठ वर्षांनंतर होणाऱ्या या निवडणुकांसाठी इच्छूक उमेदवार थांबायला तयार नाहीत. महायुती झाल्यास आपला 'गेम' होईल, अशी भीती अनेक इच्छुकांना वाटत आहे.

## अमेडियाला ४२ कोटींची नोटीस का? बावनकुळे यांचा प्रश्न



**पुणे : (समर्थ गांवकरी)**

गैरप्रकाराच्या आरोपांनंतर जमीन खरेदीचा व्यवहार रद्द करणाऱ्या अमेडिया कंपनीला बुडवलेले मुद्रांक शुल्क आणि दंड यापोटी ४२ कोटी भरण्याचे आदेश मुद्रांक शुल्क विभागाने नोटिशीद्वारे दिले होते. मात्र, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी 'मुंढवा येथील वादग्रस्त जागेचा व्यवहार रद्द करायचा आहे, तर ४२ कोटी रुपयांची नोटीस का दिली,' असा प्रश्न बुधवारी उपस्थित केला. आपल्याच खात्यातील अधिकाऱ्यांच्या कृतीवर बावनकुळे यांनी अविश्वास दर्शवल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीने मुंढव्यातील महार वतनाची जागा खरेदी केल्याच्या व्यवहारात गैरप्रकार झाल्याच्या आरोपांचे मोहोळ उठल्यानंतर हा करारच रद्द करण्यात येईल, अशी भूमिका पार्थ यांचे वडील उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी घेतली. मात्र, हा व्यवहार रद्द करण्यासाठी बुडवलेले मुद्रांक शुल्क आणि त्यावरील दंड असे ४२ कोटी रुपये भरावे लागतील, अशी नोटीस नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाने 'अमेडिया'ला बजावली आहे. या पार्श्वभूमीवर, बावनकुळे यांनी, 'व्यवहार रद्द करण्यात येत असेल, तर ४२ कोटी रुपयांची नोटीस कशाला, याचा तपास करावा लागेल,' असे वक्तव्य केले.

भाजपच्या शहर कार्यालयात महसूलमंत्री बावनकुळे बुधवारी आले होते. त्या वेळी पत्रकारांशी बोलताना त्यांनी पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीने खरेदी केलेल्या वादग्रस्त जमीन प्रकरणावर भाष्य केले.

ते म्हणाले, 'हा सरकारी जागेचा व्यवहार आहे. नोटिशीमधून जे ४२ कोटी येणार आहेत, ते नेमके कशाचे आहेत, ते मला तपासावे लागेल. कारण, आपण व्यवहार रद्द करतो आहोत. व्यवहार रद्द करताना ४२ कोटी का घ्यायचे, त्यासाठी नोटीस का दिली गेली, हेही तपासावे लागेल.'

### 'दमानियांचे पुरावे समितीसमोर मांडू'

'माहिती अधिकार कार्यकर्त्या अंजली दमानिया त्यांच्या शिष्टमंडळासह भेटण्यासाठी आल्या होत्या. या प्रकरणाबाबत त्यांच्याकडे असलेले पुरावे चौकशी समितीसमोर मांडणार आहे. ही चौकशी पूर्ण झाल्यानंतर सर्व काही समोर येईल आणि योग्य कारवाई होईल,' असे चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

### बोपोडी प्रकरणाची चौकशी

'बोपोडी येथील जमीन खरेदी प्रकरणाची चौकशी महसूल विभाग आणि पोलीस स्वतंत्रपणे करीत आहेत. या प्रकरणामध्ये लिहून देणार किंवा लिहून घेणार म्हणून पार्थ पवार यांच्या कुठेही सह्या नाहीत. या चौकशीमध्ये कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप होणार नाही, याची काळजी घेतली जात आहे,' असे चंद्रशेखर बावनकुळे यांनी नमूद केले.

## तीन हजार कोटींची थकहमी

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

नागपूरमध्ये हिंगणा तालुक्यात लाडगाव- गोधडी गावांच्या परिसरात विकसित करण्यात येणाऱ्या नव्या नागपूरमधील आंतरराष्ट्रीय व्यवसाय आणि वित्तीय केंद्रासाठी(आयबीएफसी) आवष्यक भूसंपादनासाठी तीन हजार कोटींच्या कर्जास थकहमी देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यानुसार सरकारने हुडकोडून तीन हजार कोटी रुपयांच्या कर्ज उभारणीस नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास परवानगी दिली आहे. नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत नवीन नागपूर प्रकल्पांर्गत शहराभोवती बाह्य वळण रस्ता व त्यालगत ४ वाहतूक बेट (ट्रक अ‍ॅण्ड बस टर्मिनल) विकसित करण्यात येणार आहेत. शहरामध्ये प्रवेश करणाऱ्या अमरावती राष्ट्रीय महामार्ग, हिंगणा राज्यमार्ग, समृध्दी महामार्ग, हैद्राबाद राष्ट्रीय महामार्ग, उमरेड राष्ट्रीय महामार्ग, भंडारा राष्ट्रीय महामार्ग, भोपाळ राष्ट्रीय महामार्ग, काटोल राष्ट्रीय महामार्ग, जबलपूर राष्ट्रीय महामार्ग या सर्व महामार्गांना जोडणारा नागपूर शहराभोवतीचा सुमारे १४८ किलोमीटर लांबीचा व १२० मीटर रुंदीचा बाह्य वळण मार्ग व चार ठिकाणी ट्रक व बस टर्मिनल विकसित करण्यात येणार आहे.

## 'डिजिटल' अटक आणि पावणेतीन कोटींची फसवणूक

**पिंपरी : (समर्थ गांवकरी)**

पार्सलमध्ये अमली पदार्थ असल्याचे सांगून आणि मुंबई पोलीस अधिकारी असल्याचे भासवून ज्येष्ठ नागरिकांची दोन कोटी ८० लाख रुपयांची फसवणूक केली. या गुन्ह्यातील आंतरराज्यीय सायबर टोळीचा पिंपरी-चिंचवड सायबर पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या टोळीतील सात आरोपींना कर्नाटक, तेलंगणा, केरळ आणि मुंबई अशा चार राज्यांतून पाच हजार किलोमीटरचा प्रवास करून अटक करण्यात आली. मोहम्मद आमेर अखिल मोहम्मद आरीफ (३५, हैदराबाद), जिगर जितेश पटेल (२३, मुंबई), अजिथ विजयन (३६, केरळ), सचिन पी. प्रकाश (२६, कर्नाटक), मोहम्मद रिहान मोहम्मद तजमुल (१८, म्हैसूर), सय्यद ओवेझ आफनान सय्यद शौकत (२०, म्हैसूर) आणि त्यांच्या एका साथीदाराला अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सायबर पोलीस ठाण्यात दोन स्वतंत्र गुन्हे दाखल आहेत. फिर्यादी ज्येष्ठ नागरिकांना आरोपींनी समाजमाध्यमावर व्हिडिओ कॉलद्वारे संपर्क साधला. 'कुरिअर कंपनीचा अधिकारी' आणि 'मुंबई पोलीस अधिकारी' असल्याचे भासवले. तुमच्या नावाचे पार्सलमध्ये अमली पदार्थ, लॅपटॉप आणि कागदपत्रे सापडली आहेत. त्यामुळे अटक होऊ शकते, अशी भीती दाखवून त्यांचा विश्वास संपादन केला. वरिष्ठ पोलीस अधिकारी असल्याचे सांगून आरोपींनी फिर्यादींना विविध खात्यांवर मोठ्या रकमा जमा करण्यास भाग पाडले. प्राथमिक तपासात आरोपींच्या बँक खात्यांमधून सात कोटी ८६ लाखांहून अधिक व्यवहार झाल्याचे उघड झाले आहे.

मुख्य आरोपी मोहम्मद आमेर हा महाराष्ट्र सायबरकडील ५८ कोटी रुपयांच्या फसवणूक प्रकरणातही सहभागी असल्याचे निष्पन्न झाले आहे. सायबर पोलिसांनी तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपींचे ठिकाण शोधून काढले. त्यानंतर विविध राज्यांत सलग कारवाई करत सर्व आरोपींना शिताफीने ताब्यात घेतले.

## तळेगाव, लोणावळ्यात भाजप, 'राष्ट्रवादी' चिन्हावर निवडणूक लढणार

**पिंपरी : (समर्थ गांवकरी)**

तळेगाव दाभाडे नगर परिषदेच्या निवडणुकीत नगराध्यक्षपदाची महायुतीची उमेदवारी पहिली अडीच वर्षे भाजपला दिल्यानंतर आता लोणावळा नगर परिषदेच्या निवडणुकीत नगराध्यक्षपदाची महायुतीची उमेदवारी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाला देण्यात आली आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांच्या सूचनेनुसार भाजप आणि राष्ट्रवादी हे दोन्ही पक्ष आपापल्या चिन्हावर निवडणूक लढविणार आहेत, अशी माहिती मावळचे आमदार सुनील शेळके यांनी बुधवारी दिली. आमदार शेळके म्हणाले, 'स्थानिक समितीच्या माध्यमातून निवडणुकीला सामोरे जाण्यावर ठाम होतो. परंतु, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पक्षाच्या चिन्हावर निवडणूक लढविण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे दोन्ही पक्ष आपापल्या चिन्हावर लढतील. तळेगाव दाभाडे नगर परिषदेच्या निवडणुकीत नगराध्यक्षपदाचे महायुतीचे उमेदवार भाजपचे संतोष दाभाडे असणार आहेत. नगरसेवकाच्या २८ पैकी १७ जागा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे राहतील, तर ११ जागा भाजपला देण्याचा निर्णय झाला आहे. लोणावळ्यातील नगराध्यक्षपदाचा महायुतीचा पहिला अडीच वर्षांसाठी उमेदवार राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचा असणार आहे. लोणावळ्याचे नगराध्यक्षपद अडीच वर्षे राष्ट्रवादी काँग्रेसकडे आणि अडीच वर्षे भाजपकडे राहील. अडीच वर्षांनंतर भाजपच्या उमेदवाराला निवडून आणले जाईल. लोणावळ्यातील नगरसेवकपदाच्या जागांचे सूत्र ठरले नाही. काही ठिकाणी दोन्ही पक्षांनीही उमेदवार जाहीर केले आहेत. शक्य तिथे माघार घेण्यासाठी प्रयत्न केले जातील. शक्य न झाल्यास मैत्रीपूर्ण लढत होईल.

## माजी महापौर ललित कोल्हेच्या जामिनाला विरोध

### बोगस कॉल सेंटर प्रकरण

**जळगाव : (समर्थ गांवकरी)**

बोगस कॉल सेंटर चालविल्याच्या आरोपावरून शिवसेनेचे (एकनाथ शिंदे) माजी महापौर ललित कोल्हे गेल्या महिनाभरापासून नाशिक कारागृहातील न्यायालयीन कोठडीत आहेत. दरम्यान, मुलाच्या लग्नासाठी अंतरिम जामीन मिळण्यासाठी कोल्हे यांनी आता अर्ज केला असला, तरी त्यास सरकार पक्ष आणि पोलिसांकडून तीव्र विरोध दर्शविण्यात आला आहे.



अपर पोलिस अधीक्षक अशोक नखाते यांना माजी महापौर कोल्हे यांच्या जळगाव शहरालगतच्या ममुराबाद रस्त्यावरील फार्म हाऊसवर बोगस कॉल सेंटर सुरू असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे नखाते यांनी २८ सप्टेंबर रोजी एल. के. फार्महाऊसवर छापा टाकला असता, तब्बल ३१ लॅपटॉप तसेच कॉल सेंटर चालविण्यासाठी वापरली जाणारी अत्याधुनिक यंत्रणा आढळून आली.

प्राथमिक तपासणीत हे कॉल सेंटर परदेशी नागरिकांची फसवणूक करण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आल्याचे उघड झाले. कॉल सेंटरमधील कर्मचारी स्वतःला अधिकृत एजंट असल्याचे भासवून डेटा तपासण्याच्या किंवा विविध आकर्षक ऑफर देण्याच्या बहाण्याने विदेशी नागरिकांकडून पैसे उकळत होते. पोलिसांच्या तपासात दोन लॅपटॉपवर आर्थिक व्यवहार झाल्याचे पुरावेही सापडले होते.

ऑनलाईन फसवणुकीच्या उद्देशाने बोगस कॉल सेंटर चालविल्याच्या आरोपावरून पोलिसांनी माजी महापौर कोल्हे आणि इतर आठ संशयितांच्या विरोधात संघटित गुन्हेगारीसह माहिती तंत्रज्ञान कायद्यांर्तगत गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिसांकडून सुरू असून, बोगस कॉल सेंटरच्या मागील मुख्य सूत्रधारांचा शोध घेण्याचे प्रयत्न सुरु आहेत. सध्या कोल्हे नाशिकच्या कारागृहातील न्यायालयीन कोठडीत आहे.

दरम्यान, मुलाचे काही दिवसांत लग्न असल्याने अंतरिम जामीन देण्याचा अर्ज कोल्हे यांनी न्यायायलाकडे सादर केला आहे. त्यावर सुनावणी झाली असता, कॉल सेंटर चालविण्यासाठी संशयितांचे विदेशात कोणी साथीदार आहेत का, यादृष्टीने आंतरराष्ट्रीय कनेक्शनचा आणि गुन्ह्यातील मुख्य सूत्रधारासह अन्य संशयितांचा शोध इंटरपोलच्या मदतीने घेणे बाकी असल्याचे उपविभागीय पोलीस अधिकारी नितीन गणापुरे यांनी न्यायालयाला सांगितले. सरकार पक्षातर्फे सहाय्यक संचालक तथा गृह विभागाच्या सरकारी अभियोक्ता संगिता ढगे यांनी म्हणणे सादर केले. बोगस कॉल सेंटर प्रकरणाचा गुन्हा आंतरराष्ट्रीय स्वरूपाचा आहे. तसेच संबंधितांवर संघटित गुन्हेगारीची कलम लागू आहेत. मुलाच्या लग्नासाठी अंतरिम जामीन मागणारे माजी महापौर ललित कोल्हे यांच्यावर यापूर्वीही अनेक गुन्हे दाखल आहेत, याकडे न्यायालयाचे लक्ष वेधून कोल्हेंच्या अंतरिम जामिनाला विरोध करण्यात आला.

# दिल्ली : तख्त अन् रक्त

साप्ताहिक सुट्टीनंतर कामाच्या पहिल्या दिवशी, सोमवारी सायंकाळी गर्दीच्या वेळी, चांदनी चौक ते लाल किल्ला या गजबजलेल्या परिसरात एका कारमध्ये झालेला स्फोट, त्यात डझनभर निरपराधांचा मृत्यू, वीसेक लोकांची इस्पितळात मृत्यूशी झुंज, या घटनेने राजधानी दिल्ली, तसेच देश हादरला आहे. देशाच्या कानाकोपऱ्यात दु:ख व संताप व्यक्त होत आहे. त्या भीषण स्फोटानंतर अनेकांच्या उडालेल्या चिंधड्या, स्फोटानंतर सिग्नलवर थांबलेल्या अनेक गाड्यांना लागलेली आग आणि त्यात होरपळलेले प्रवासी हा सगळा प्रकार असह्य वेदना देणारा आहे. गेल्या एप्रिल महिन्यात काश्मीर खोऱ्यात पहलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेला निरपराध पर्यटकांचा संहार, त्याला प्रत्युत्तर म्हणून भारताने पाकव्याप्त काश्मीरमधील अतिरेक्यांचे अड्डे उद्ध्वस्त करण्यासाठी राबविलेल्या आणि अचानक थांबविलेल्या 'ऑपरेशन सिंदूर'च्या जखमा अद्याप पूर्णपणे भरलेल्या नाहीत. भारताच्या कठोर प्रत्युत्तरामुळे पाकपुरस्कृत दहशतवादी कारवायांना आळा बसेल, किमान काही काळ तरी देशात, विशेषत: जम्मू-काश्मीर व उत्तर भारतात शांतता नांदेल, असे वाटत असताना थेट राजधानी दिल्लीत स्फोटाची घटना घडली. जवळपास १४ वर्षांनंतर राजधानीत दहशतवादी हल्ला झाला. त्यामुळे सरकार, प्रशासन तसेच सामान्य नागरिक अशा सर्वांनाच चिंता वाटणे स्वाभाविक आहे. गृहमंत्री अमित शाह यांची तातडीने घटनास्थळी भेट,



## संपादकीय

लोकनायक जयप्रकाश इस्पितळात जखमींची भेट, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची गृहमंत्र्यांशी चर्चा, या सर्व बाबी सरकारची चिंता अधोरेखित करणाऱ्याच आहेत. लगेच सरकारने जाहीर केले नसले, तरी हा स्फोट म्हणजे आणखी एक दहशतवादी हल्लाच आहे. म्हणूनच, त्याचा तपास एनआयए या राष्ट्रीय तपास यंत्रणेकडे सोपविण्यात आला आहे. अटक केलेल्या संशयितांचे तपशील, काश्मीरशी जुळलेले त्यांचे धागेदोरे हे पाहता हा हल्ला अत्यंत सुनियोजितपणे केल्याचे स्पष्ट होते. स्फोटासाठी प्रचलित पद्धतीपेक्षा काहीतरी नवे तंत्र वापरल्याचे प्रथमदर्शनी दिसते. केंद्र तसेच राज्य सरकारांच्या विविध तपास यंत्रणा, दहशतवादविरोधी पथके गेले तीन दिवस विविध भागांत अशा हल्ल्यांचे षडयंत्र उघडकीस आणत असताना, त्यानिमित्ताने सर्वत्र सतर्कतेचा इशारा दिलेला असताना हा हल्ला झाला, हे अधिक चिंताजनक आहे आणि त्यातून गुप्तचर यंत्रणांचे अपयशदेखील चव्हाट्यावर आले आहे. रविवारी गुजरात व उत्तर प्रदेशच्या एटीएसने एरंडाच्या बियांमधील सिरीन या विषारी रसायनांच्या मदतीने दहशतवादी हल्ला करण्याचा डाव उधळून लावला. एका डॉक्टरसह तिघांना अटक केली. या तिघांनी म्हणे अहमदाबाद, लखनौसह दिल्लीतही रेकी केली होती. पाठोपाठ, सोमवारी दिल्लीनजीकच्या फरिदाबाद येथील अल-फलाह युनिव्हर्सिटीमधील दोघांसह तीन डॉक्टरांना स्फोटकांसाठी वापरले जाणारे जवळपास तीन टन अमोनियम नायट्रेट, काही टाइमर्स व शस्त्रांसह पकडण्यात आले. त्यात लखनौच्या एका महिला डॉक्टरचाही समावेश आहे. डॉ. शाहीन शहीद नावाच्या या महिला डॉक्टरकडे म्हणे पाकिस्तानातील जैश-ए-मोहम्मद या अतिरेकी संघटनेच्या जमात-उल-मोमिनात नावाच्या महिला आघाडीची जबाबदारी सोपविण्यात आली होती. या आघाडीची धुरा कुख्यात दहशवातदी मसूद अजहरची बहीण सादिया सांभाळते. दिल्लीतील स्फोटाचा संबंध गुजरात, हरयाणा व उत्तर प्रदेशातील दोन दिवसांच्या कारवायांशी दिसतो. धक्कादायक म्हणजे या कटामध्ये अत्यंत सुशिक्षित अशा काही डॉक्टरांचा समावेश आहे. फरिदाबादमधीलच स्फोटके दिल्लीत वापरली गेली असे दिसते. याचा अर्थ स्पष्ट आहे - राजधानीपासून हाकेच्या अंतरावर संभाव्य दहशतवादी हल्ल्याचा पर्दाफाश होत असताना, दिल्लीतील मोक्याच्या ठिकाणांची संशयितांनी रेकी केलेली असतानाही दिल्ली पोलिसांनी अक्षम्य हलगर्जी दाखविली आणि त्याची किंमत निरपराधांच्या बळींच्या रूपाने देशाने मोजली.

## दै. समर्थ गांवकरी सूडोकू क्र. ३५

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 8 | 5 | 6 | | 2 |
| | 4 | 2 | | 7 | | | 1 | |
| 3 | 6 | | | | | | 5 | |
| | | | 2 | 4 | 6 | 7 | | 5 |
| | 5 | | 9 | | 7 | | 8 | |
| 4 | | 9 | 8 | 5 | 3 | | | |
| | 2 | | | | | | 3 | 1 |
| | 3 | | | 9 | | 2 | 7 | |
| 7 | | 1 | 4 | 3 | | | | |

उत्तर उद्याच्या अंकात

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

### सूडोकू क्र. ३४ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | 2 | 1 | 5 | 6 | 7 | 3 | 4 | 8 |
| 6 | 4 | 8 | 1 | 3 | 2 | 5 | 9 | 7 |
| 5 | 3 | 7 | 9 | 8 | 4 | 6 | 2 | 1 |
| 7 | 8 | 9 | 3 | 4 | 5 | 1 | 6 | 2 |
| 2 | 1 | 3 | 7 | 9 | 6 | 4 | 8 | 5 |
| 4 | 6 | 5 | 2 | 1 | 8 | 7 | 3 | 9 |
| 1 | 5 | 6 | 4 | 2 | 9 | 8 | 7 | 3 |
| 8 | 7 | 2 | 6 | 5 | 3 | 9 | 1 | 4 |
| 3 | 9 | 4 | 8 | 7 | 1 | 2 | 5 | 6 |

**पंचांग**
१३ नोव्हेंबर २०२५
गुरुवार
विक्रम संवत्- २०८२
कार्तिक शके
संवत्- १९४७

संवत्सर - विश्वावसूनाम
अयन- दक्षिणायान
मास- कार्तिक
ऋतु- सौर हेमंत
कृष्ण पक्ष
तिथि:नवमी २३:३४:१९

नक्षत्र:मघा १९:३८:०२
योग:ब्रह्म ०६:५७:२९
योग:ऐन्द्र ३०:२६:५९+
करण:तैतिल ११:११:०३
करण:गर २३:३४:१९
सूर्य:तुला

## उपदेशाचे डोस

### निर्भय

भावाची प्रकृती बिघडल्याचा निरोप गणपतला मिळाला तेव्हा तिन्हीसांजा उलटून गेल्या होत्या. त्या काळी विजेचे दिवे नव्हते. गणपत कंदिल घेऊन गावी निघाला. गावाची वाट जंगलातून जाणारी होती. सभोवताली किर्र्र काळोख पसरला होता. त्यामुळे वातावरण जास्तच भीषण झाले होते. रस्ता निर्मनुष्य. इतक्यात एक झाडाची फांदी पडली. गणपत घाबरला आणि एका झाडावर आदळला. त्यामुळे कंदिल पडला आणि फुटला. घाबरत गणपत उठला. त्याला चालण्याची चाहूल लागली. गणपतला वाटले भूतच आहे. त्यामुळे तो किंचाळला. किंचाळलेला आवाज ऐकून चालणारा माणूस पुढे आला पण तो पांगळा होता. त्याच्या कुबड्यांचा तो आवाज होता, ते काही भूत नव्हते. त्या पांगळ्याने गणपतला विचारले, एवढ्या अंधारात कुठे निघालात? गणपतला हा आवाज एका माणसाचा आहे हे कळले आणि तो एकदम शांत झाला. त्याची भीतीच पळाली. तो निर्भय झाला आणि त्याने पांगळ्याचा हात हातात घेतला आणि चालू लागला. परमेश्वराच्या रूपाने तो पांगळा गणपतला भेटला. कारण त्याचा पांगळेपणा गणपतला जाणवलाच नाही. उलट त्याचा भरभक्कम अंधारच वाटला. म्हणून परमेश्वर सतत सांगाती असतो ही भावना मनात रुजवली की कायम त्याची साथ मिळेल आणि आपण निर्भय बनू.

कथा उपदेश : निर्भय बनवून परिस्थीचा सामना करा.

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १७६९ - नेपाळचा स्वातंत्र्यदिन.
- २००६ - दक्षिण चिलीमध्ये सैनिकांना घेऊन जाणारी एक बस पुलावरुन नदीत कोसळून सतरा सैनिक व अन्य दोन जण ठार झाले.

### राष्ट्रीय

- १९१३ - रवींद्रनाथ टागोर यांच्या 'गीतांजली' या काव्याला साहित्याचा नोबेल पुरस्कार मि ळाल्याचे जाहीर करण्यात आले.
- १९३१ - मामाराव दाते यांनी मोनोटाईप मशिनवर देवनागरी लिपीची यांत्रिक जुळवणी करण्याचा प्रयोग सफल केला.


### जन्म

- १३१२ - एडवर्ड तिसरा, ईंग्लंडचा राजा.
- १७६० - जियाकिंग, चीनी सम्राट.
- १७८० - रणजितसिंग, पंजाबचे महाराणा.
- १८४८ - आल्बर्ट पहिला, मोनॅकोचा राजा.
- १८५० - रॉबर्ट लुई स्टीवन्सन, स्कॉटीश लेखक.
- १८५८ - पर्सी मॅकडोनेल, ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू.
- १८८५ - गोविंद बल्लाळ देवल, मराठीतील श्रेष्ठ नाटककार.

### निधन

- ८६७ - पोप निकोलस पहिला.
- १०९३ - माल्कम तिसरा, स्कॉटलंडचा राजा.
- ११४३ - फल्क, जेरुसलेमचा राजा.
- १२४० - रझिया सुलताना, गुलाम घराण्यातील एक कर्तबगार राजकर्ती.
- १७७० - जॉर्ड ग्रेनव्हिल,युनायटेड किंग्डमचा पंतप्रधान.
- २००७ - विजय खंडेलवाल, भाजपा प्रदेश समितीचे कोषाध्यक्ष व खासदार.

## दै. समर्थ गांवकरी जम्बो शब्दकोडे क्र. ३५



**आडवे शब्द**

१. मूर्ख
४. पूर्ण साठ मिनिटे
७. पुष्कळ, अमर्याद
९. पुरुष
१०. दारू (हिंदी)
११. आयातकर
१३. कौटिल्याचे एक नाव
१४. माळी
१६. नौदल
१७. ही एक हाताने वाजत नाही
१८. वडील
२०. श्वासोच्छावास
२३. कोठेही जा सर्वत्र सारखीच स्थिती असते, या अर्थाची म्हण
२६. नव्वद अंशाच्या आतील कोन
२८. कार्य, काज
२९. वैयक्तिक, स्वत:चे
३१. चंद्र
३३. सत्व
३५. एक मंगल वाद्य
३६. विष्णुपत्नी
३७. जास्तीत जास्त कमीत कमी
३८. खिन्न, कष्टी
४०. शूर
४१. नूतन
४३. संयोग, संसर्ग, नाते
४५. श्रीकृष्णाचे एक नाव
४७. संतापी, चटकन राग येणारा
४९. नवऱ्याचा भाऊ
५०. लोणी
५३. वाळवंट
५५. पत्ती, तपास, शोध
५६. रड्या माणूस
५७. हलाहल पचवणारा याअर्थी शंकराचे नाव
५९. हाका मारून बोलावणे
६१. धरणे
६३. मातापिता
६६. योगायोग
६९. नाराजी
७०. टिकून राहणे
७१. बारीक ताप

**उभे शब्द**

१. दुबळा, गरीब
२. जनावरांची आरोळी
३. चलनवलन
४. चांदणी
५. निमित्त
६. धोबी
८. पाठोपाठ
१०. संभवनीयता
१२. चारचाकी वाहनप्रकार
१५. एक क्षार
१६. आजूबाजूला
१७. पाणी साठवण्यासाठी बांधलेला हौद
१९. बारा वर्षाचा काळ
२०. कुत्रा
२१. दाट मैत्री, जवळीक
२२. एक पक्षी
२४. धनुष्यबाण
२५. ठाणवई देवापाशी तेवत ठेवण्याचे एक उंच साधन
२७. डोळ्यादेखत
२८. अरण्य
२९. लोणच्यातील द्रव
३०. एकत्र जमण्यास विरोध करणारा हुकूम
३२. कोल्हापूर शहराचे एक नाव
३४. कमीजबरोबरचे एक वस्त्र
३५. सगळ्यांना सारखाच न्याय, सारखेपणा
३९. मोठा भाऊ
४२. गुंडी
४४. भूकंप
४६. नासक्या दुधाच्या वड्या
४८. पुन्हास
५१. थेट
५२. श्रीकृष्णाच्या प्रेमासाठी विष पचविणारी स्त्रीभक्त
५४. मालक
५५. एक सुगंधी वनस्पती
५८. फसविणे
५९. पुण्याचा रहिवासी
६०. मुख्य पदार्थाबरोबर तोंडी लावण्याचा पदार्थ
६२. एक ऋतु
६३. ज्वाला, दाह, अग्नी
६४. पादत्राण
६५. दु:ख, सल, बोच
६७. हादरा, नौका उभी करण्याची जागा
६८. संयोग, प्रसंग

उत्तर उद्याच्या अंकात

**शब्दकोडे क्र. ३४ चे उत्तर**

आडवे उत्तर : १.वेचक ४.पातक ६.जनक ९.पालक ११.तरतरीत १३.शासकीय १४.लाख १६.रत १७.अवसर १९.जळमट २०.बेसन २१.साख २३.सीमा २४.अवांतर २६.नातलग २८.सकट ३०.कनकाचल ३१.स्तवन ३३.राजीवलोचन ३७.कर्म ३८.धव ३९.करा ४०.येनकेन प्रकारेण ४३.नगर ४५.सनई ४६.तट ४९.सम ५१.टणक ५२.सटरफटर ५४.अंग ५६.फटकन ५८.तवा ५९.सागरतट ६१.नाती ६२.तप ६४.वाईट ६६.लंकादहन ६९.रस्ता ७०.परवानगी ७४.पाया ७५.काकड ७६.जनगणमन ७८.अचानक ७९.करडे ८०.जपान ८१.तर

उभे उत्तर : १.वेतन २.चर ३.कतरबेत ४.पात ५.कडवट ७.नशा ८.कसर ९.पायजमा १०.कलाम १२.रीतसर १५.खटपट १८.रसातल २२.खल २४.अपराध २५.जनन २६.नाचता येईना अंगण वाकडे २७.गस्त २९.कणकण ३०.कचरा ३२.नलिका ३४.जीवन ३५.लोकर ३६.निकेतन ४१.नट ४२.रेखाटन ४४.गवार ४५.समर ४७.पाककृती ४८.कसरत ४९.सटवाई ५०.खाट ५३.फतवा ५५.गर ५६.फटका ५७.कलह ६०.तलंगी ६३.परवचा ६५.टप ६७.दशानन ६८.नहाण ७१.रकार ७२.नड ७३.वानर ७४.पाक ७६.जपा ७७.मत


# वाबळेच्या विनामूल्य महाआरोग्य शिबीरास प्रचंड प्रतिसाद

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर येथील गुलमोहर रोडला आम्रपाली गार्डन मध्ये स्थानिक नागरिकांच्या आरोग्यविषयक जाणीवेत वाढ व्हावी या हेतूने माजी सैनिक मनसुख वाबळे व सौ. शालिनी वाबळे यांच्या वतीने मोफत महा आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले.होते त्यास प्रचंड प्रतिसाद मिळाला असून सुमारे ४०० नागरिकांनी त्याचा लाभ घेतला तर २०० नागरिकांना मोफत चष्मा देण्यात आला. यावेळी बालरोगतज्ञ डॉ.रामदास बांगर, डॉ. राहुल पंडित,डॉ.अतुल खालकर, डॉ.अरविंद अनचवले,



नेत्रतज्ञ डॉ.प्रफुल चौधरी, डॉ.अमित करडे, माजी सैनिक मनसुख वाबळे, सौ.शालिनी वाबळे, सागर वाबळे आदी उपस्थित होते. वाबळे दांम्पत्याचा हा उपक्रम कौतुकास्पद आहे, ज्या समाजात आपण रहातो त्या समाजाकरीता केलेला उपक्रम महत्वाचा आहे. आजच्या वेगवान जीवनशैलीत नागरिक आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करत आहेत. आजार झाल्यानंतर उपचार घेण्यापेक्षा नियमित तपासणी करून रोग लवकर बरा करावा समाजात आरोग्यविषयक जनजागृती करण्यासाठी अश्या शिबिराचे आयोजन गरजेचे आहे. असे प्रतिपादन डॉ. रामदास बांगर यांनी केले. शिबिरात नामांकित अस्थिरोग तज्ज्ञ, स्त्रीरोगतज्ज्ञ, पोटासंबंधी समस्या, बालरोगतज्ज्ञ,मोफत चष्म्यांसह,नेत्रतज्ज्ञ, रक्त तपासणी करणार आली या शिबिरासाठी वाबळे मित्रमंडळ, भारतीय माजी सैनिक संघटना, नगर जिल्हा माजी सैनिक संघटना यांचे सहकार्य लाभले आहे अशी माहिती मनसुख वाबळे व सौ.शालिनी वाबळे यांनी दिली आहे.



**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी) :** प्रो कबड्डी स्पर्धेत पुणेरी पलटणचा संघ उपविजेता ठरला यामध्ये अहिल्यानगरचा असलेला खेळाडू आदित्य शिंदे याचा उत्कृष्ट सहभाग होता त्याबद्दल जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या वतीने खा निलेश लंके व प्रा शशिकांत गाडे यांनी त्याचा सत्कार केला.

## थोडक्यात बातम्या...



### आठवडी बाजारात दुकाने व वाहने रस्त्यावर लावणाऱ्यांवर कारवाई करा

■ प्रहर तालुका अध्यक्ष वसंत पानसरे यांनी दिले निवेदन

**शहापूर (स. गांवकरी) :** कृषी उत्पन्न बाजार समिती शहापूर आठवडी बाजारात शहापूर तालुक्यासह बाहेरील शेतकरी, व्यापारी व ग्राहक मोठ्या प्रमाणात येत असतात.मात्र याठिकाणी अनेक दुकाने व वाहने नियबाह्य पद्धतीने राष्ट्रीय महामार्गा लगत लागलेली असतात.यामुळे याठिकाणी अनेक अपघात होतात.भविष्यात याठिकाणी मोठा अपघात घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नंदकुमार डोहळे व उपसभापती शरद वेखंडे, शहापूरचे तहसीलदार परमेश्वर कासुळे,पोलिस निरीक्षक मुकेश ढगे व गोठेघर ग्रामपंचायत यांना एक निवेदनाद्वारे याठिकाणी अवैद्य रित्या दुकाने व वाहने पार्किंग केल्यास त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. यावेळी प्रहार तालुका अध्यक्ष वसंत पानसरे,सचिव विनायक बोद्रें, युवा संघटक मयूर किरपण व युवा सहसचिव निलेश बोटकोंडळे अदि प्रहार जनशक्ती पक्षाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

**Agasti Sahakari Sakhar Karkhana Ltd. Agastinagar**
Tal - Akole, Dist-Ahmednagar
Email-agastisakhar@rediffmail.com

**TENDER NOTICE FOR SALE OF R.S.**

We are interested to sale Potable R.S. of season 2025-26 total Quantity 10 Lakh Ltrs. The purchasers are requested to send their highest quote rate by mail on or before dt. 18/11/2025 Negotiation date will be confirm after meeting.

**Managing Director Vice Chairman Chairman**

**जाहीर नोटीस**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात...**

क्र.कावि/जन्म/मृत्यु नोंद/३९/२०२५ अकोले दि. २८/१०/२०२५

तमांम नागरिकांस कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार **श्री. काळु चिंधु गभाले, रा. मान्हेरे**, ता. अकोले, जि. अहिल्यानगर यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये **अर्जदार यांची आत्या कै. गंगुबाई विठु लांघी यांचा मृत्यू दि. २५/०७/१९९९** रोजी **मौजे मान्हेरे** येथे झाला असुन त्यांच्या **आत्याच्या मृत्यूची** नोंद **ग्रामपंचायत मान्हेरे**, ता.अकोले यांचे जन्म-मृत्यु रजिस्टरला नोंद आदेश होणेकामीचा अर्ज मे तहसिल कार्यालय येथे दाखल केला आहे.

तरी **श्री. काळु चिंधु गभाले, रा. मान्हेरे**, ता. अकोले जि. अहिल्यानगर यांचे **अर्जदार यांची आत्या कै. गंगुबाई विठु लांघी यांचा मृत्यू दि. २५/०७/१९९९** रोजी **मौजे मान्हेरे** येथे झाला असल्याची नोंद **ग्रामपंचायत मान्हेरे**, ता.अकोले येथे मृत्यूची नोंद होण्याबाबत कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यांसह हरकत मे. कोर्टासमोर हजर होऊन पुराव्या निशी दाखल करावी अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर मृत्यूची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही, असे समजुन मे. न्यायालय पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि. २८/१०/२०२५ रोजी सही व शिक्कयानिशी दिले असे.

हुकूमावरुन,
**कामगिरी क्लर्क** **तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अकोले**

**जाहीर नोटीस**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात...**

क्र.कावि/जन्म/मृत्यु नोंद/३९/२०२५ अकोले दि. २८/१०/२०२५

तमांम नागरिकांस कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार **श्री. काळु चिंधु गभाले, रा. मान्हेरे**, ता. अकोले, जि. अहिल्यानगर यांनी जन्म- मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये **अर्जदार यांची आत्या कै. सखुबाई लक्ष्मण भांगरे यांचा मृत्यू दि. १६/०१/१९९३** रोजी **मौजे मान्हेरे** येथे झाला असुन त्यांच्या **आत्याच्या मृत्यूची** नोंद **ग्रामपंचायत मान्हेरे**, ता.अकोले यांचे जन्म-मृत्यु रजिस्टरला नोंद आदेश होणेकामीचा अर्ज मे तहसिल कार्यालय येथे दाखल केला आहे.

तरी **श्री. काळु चिंधु गभाले, रा. मान्हेरे**, ता. अकोले जि. अहिल्यानगर यांचे **अर्जदार यांची आत्या कै. सखुबाई लक्ष्मण भांगरे यांचा मृत्यू दि. १६/०१/१९९३** रोजी **मौजे मान्हेरे** येथे झाला असल्याची नोंद **ग्रामपंचायत मान्हेरे**, ता.अकोले येथे मृत्यूची नोंद होण्याबाबत कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यांसह हरकत मे. कोर्टासमोर हजर होऊन पुराव्या निशी दाखल करावी अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर मृत्यूची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही, असे समजुन मे. न्यायालय पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि. २८/१०/२०२५ रोजी सही व शिक्कयानिशी दिले असे.

हुकूमावरुन,
**कामगिरी क्लर्क** **तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अकोले**

# स्वामी वैष्णवानंद पुण्यतिथीनिमित्त १५ ते १७ नोव्हेंबर धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम

**नायगाव : (समर्थ गांवकरी)**

मांजरम येथील स्वामी वैष्णवानंद संस्थानात दरवर्षीप्रमाणे स्वामी वैष्णवानंद यांच्या पुण्यतिथीनिमित्त १५ ते १७ नोव्हेंबर रोजी सांस्कृतिक, धार्मिक व सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या मध्ये नामवंत कीर्तनकार,व प्रतिभावान कलावंत या सोहळ्यात सहभागी होणार असल्याची माहिती स्वामीजींचे वंशज बाळासाहेब पांडे मांजरमकर यांनी दिली.

कार्तिक वद्य एकादशी दि. १५ नोव्हेंबर शनिवार रोजी सकाळी स्वामींच्या समाधीचे पूजन, रात्री ७ वाजता वे. शा.सं. रमेश गुरु राहेरकर यांच्या मार्गदर्शनाखाली अभिषेक सोहळा, रात्री ९ ते १२ विठ्ठलेश्वर भजनी मंडळ,




जिजामाता महिला भजनी मंडळ, महात्मा बसवेश्वर भजनी मंडळ, हनुमान सेवा दल, गुरुदेव सेवा भजनी मंडळ मांजरम यांच्या भजनाचा कार्यक्रम होणार आहे. कार्तिक वद्य द्वादशी १६ नोव्हेंबर रविवार रोजी स्वामीच्या

पुण्यतिथीचा सोहळा, सकाळी प्रा. भूषण कुलकर्णी व श्रीनिवास पांडे यांच्या हस्ते समाधी पूजन, दुपारी १ ते ३ स्वामीच्या पुण्यतिथीचा सोहळा वैदीय कार्यक्रमाने साजरा होईल. सर्वश्री वे.शा.सं. रमेश गुरु राहेरकर, धनंजय महाराज कापसिकर,संतोष महाराज राहेरकर, बाळासाहेब कुलकर्णी बरबडेकर ,उमेश नायगावकर,

यांच्या मार्गदर्शनाखाली वैदिक विधी होणार आहे. दुपारी ३ ते ४ ह.भ.प. महंत श्री विशुद्धानंद महाराज सिद्धतीर्थ धाम हळदा तालुका कंधार यांचे प्रवचन व दर्शन सोहळा होईल या नंतर ह.भ.प. बाबू गुरु शिराढोणकर यांचे स्वामीच्या गुलालाचे भजन, त्यांना हार्मोनियमची साथ अनंतराव मंगनाळे, गायन सुधाकर कुलकर्णी चोराखळीकर, विनायक पाटील शिंदे, परमेशवर केते महाराज, विकास भूरे महाराज, गोविंद विभुते,तबला साथ हरिप्रसाद पांडे मांजरमकर, मृदंग साथ बालू महाराज पांडे यांची राहणार आहे. रात्री ७ ते ९ आंतरराष्ट्रीय ख्यातीची बाल गायिका कु. वीरा गणेश हाके या बालिकीची "अभंगवाणी संताची" हा कार्यक्रम ,रात्री ९ ते ११ रेडिओस्टार विनोदाचार्य ह.भ.प. चंद्रकांत महाराज लाठकर यांचे कीर्तन, रात्री ११ ते १२ दरम्यान प्रसिद्ध तबलावादक तथा तळवळकर गुरुजी यांचे शिष्य प्रशांत गाजरे नांदेड यांचे पट शिष्य अभिषेक देशपांडे व हरिप्रसाद पांडे यांचे तबलावादन, १२ ते १ दरम्यान भजनसम्राट विश्वनाथ भोगले यांचा 'भजनसंध्या' व मास्टर ईशांत नांदेडकर (कोकण )यांचा भारुड व गौळणीचा नृत्याविष्कार कार्यक्रम साजरा होणार आहे. रात्री जागर भजना चां कार्यक्रम होणार असून यामध्ये संगीत अलंकार प्राप्त, शंकर बिरादार, प्रा. माधव किन्हाळकर, कु .भाग्यश्री पांडे, त्र्यंबक अप्पा स्वामी, पवन गादेवार, रमेश पा. खैरगावकर, बालाजी चौधरी, मनोज आरगुलवार, शरद पा. कोलंबीकर, शंकर पाटील मुगावकर, श्याम पाटील नरंगलकर, रावसाहेब पाटील, डॉ. मनोहर तेलंग, दत्ता पाटील ,व कोलंबी, नरंगल, मोकासदरा, मांजरम वाडी गोधमगाव येथील भजनी मंडळीचे कलावंत हजेरी लावणार आहेत. तबला साथ नामदेव पांचाळ, संजय देशपांडे, मृदंग विश्वेश्वर जोशी कोलंबीकर, ऋषिकेश बेळीकर, ढोलकी सूर्यकांत पातावार, ढोल ज्ञानेशवर बैस, ट्रीबलसाथ हरिप्रसाद पांडे, बासरी वादन विजय द्रोणाचार्य, हार्मोनियम गणेश हाके सर,व मारोती कोंडमंगल यांची साथ राहणार आहे.

# कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सचिवांवर चौकशीची मागणी

**अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये कर्मचाऱ्यांना दिवाळी सणानिमित्त सानुग्रह अनुदान/बोनस देण्याच्या नावाखाली कर्मचाऱ्यांच्या पगारातून १५ दिवसांचे वेतन कपात करून सुमारे २५ लाख रुपयांचा कथित आर्थिक गैरप्रकार करण्यात आल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणाची तातडीने चौकशी करून संबंधित सचिवांवर कारवाई करण्याची मागणी बाजार समितीचे गेटमन सुलक्षण लक्ष्मण मेहेत्रे यांनी केली असून, त्यांनी याबाबत पणन संचालक, जिल्हा उपनिबंधक तसेच कोतवाली पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल केली आहे. सुलक्षण मेहेत्रे यांनी निवेदनात नमूद केले आहे की, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव यांनी कर्मचाऱ्यांना दिवाळीसाठी ६५ दिवसांचे सानुग्रह अनुदान मंजूर केले. मात्र ही रक्कम कर्मचाऱ्यांच्या खात्यावर जमा करताना किंवा केल्यानंतर प्रत्येक कर्मचाऱ्याच्या पगारातून १५ दिवसांचे वेतन कपात करून अंदाजे २५ लाख रुपये इतकी रक्कम सचिवांच्या सांगण्यावरून तीन कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यांमध्ये जमा करण्यात आली.

# जुन्नर तालुक्यासाठी ११ कोटी निधी व १२ पिंजरे मंजूर : वनमंत्री गणेश नाईक

**आळेफाटा : (समर्थ गांवकरी)**

जुन्नर, शिरूर, आंबेगाव तालुक्यात (पिंपरखेड, ता.आंबेगाव) परिसरात बिबट्यांचा हल्ला झालेल्या तीनही ठिकाणी महाराष्ट्र राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी प्रत्येक घरात भेट दिली व त्यांचे सांत्वन केले.

जंगलतोड झाल्याने सिमेंटची जंगल वाढल्याने तसेच ऊस लागवडीचे क्षेत्र वाढू लागल्याने बिबट्या आता उसात वास्तव्य करू लागला आहे. त्याला बाहेर शिकार उपलब्ध होत नाही तो माणसांवर हल्ले करू लागला आहे. बिबट्या -मानव संघर्ष वाढू लागला आहे. वनखात्याने पकडलेले बिबटे गुजरात आणि दक्षिण आफ्रीका या ठिकाणी पाठवले



जाणार आहे. तसेच तात्काळ एक हजार पिंजरे घेण्यासाठी शासनाने निधी उपलब्ध करून दिला आहे अशी माहिती वनमंत्री गणेश नाईक यांनी बेल्हे (ता. जुन्नर )याठिकाणी एका खाजगी कार्यक्रमात माध्यमांशी बोलत होते.

वनमंत्री गणेश नाईक म्हणाले, यापुढे पकडलेले बिबटे सोडून न देता हे बिबटे गुजरात येथील वनतारा येथे पाठवण्यात येणार आहे. वनताराची टीम माणिकडोह येथील निवारा केंद्रावर आली आहे. त्यांच्याशी चर्चा सुरु आहे तसेच दक्षिण आफ्रीका येथे बिबट्याची मागणी असून केंद्र सरकारच्या मदतीने तिकडे सुद्धा बिबटे पाठवण्याचा आमचा प्रयत्न आहे.

यापुढे बिबट्याच्या हल्ल्यात मानवाचा मृत्यू होणार नाही याबाबत ची खबरदारी वन खात्याकडून घेतली जाणार असल्याचे नाईक यांनी सांगितले.

दरम्यान जुन्नर तालुक्यामध्ये ७०० ते ८०० बिबटे असावे असा वनखात्याच्या अधिकाऱ्याचा अहवाल असला तरी प्रत्यक्षात १ हजार ५००ते २ हजार बिबटे असावेत असा खुद्द वनमंत्री यांनी बोलून दाखवले आहे. त्याचप्रमाणे जुन्नर तालुक्यासाठी प्राथमिकरित्या ११ कोटी रुपये तसेच अहिल्यानगरसाठी ११ कोटी हे उपाययोजनासाठी तात्काळ मंजूर करण्यात आले.

बाराशे पिंजरे तात्काळ मंजूर केले. त्यापैकी २०० पिंजरे दाखल सुद्धा झाले आहेत. त्याचप्रमाणे वनताराच्या अधिकाऱ्यांची नारायणगाव या ठिकाणी भेट घेऊन चर्चा करून आत्तापर्यंत पकडलेले सर्व बिबटे तात्काळ वनतारा याठिकाणी हलविण्याचे आदेश देण्यात आले.

याप्रसंगी नवी मुंबईचे नगरसेवक विजय वाळुंज, त्याचप्रमाणे नवी मुंबईतील अनेक मान्यवर उपस्थित होते.

# राष्ट्रीय स्तरावरील 'महाकुंभ इनोव्हेशन समिट'मध्ये पारितोषिक

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या विद्यार्थिनीने राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत विद्यापीठाचा गौरव वाढविला आहे. एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई येथे दि. ९ नोव्हेंबर, २०२५ रोजी आयोजित करण्यात आलेल्या 'महाकुंभ इनोव्हेशन समिट' या राष्ट्रीय स्पर्धेत विद्यापीठाची विद्यार्थिनी भूमिका राठोड हिने आपल्या 'सर्वायकल कॅन्सर किट' या नावीन्यपूर्ण संशोधन प्रकल्पासाठी सांत्वन पारितोषिक प्राप्त केले.

या स्पर्धेत भूमिकाला रु.




१०,०००/- नगदी पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. महिलांमधील सर्वायकल कॅन्सरचे लवकर निदान करण्यासाठी उपयुक्त ठरणारी ही किट ही एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि सामाजिकदृष्ट्या उपयोगी संकल्पना असल्याचे परीक्षकांनी नमूद केले.

महाकुंभ इनोव्हेशन स्पर्धेत विद्यापीठातील एकूण १५ विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला, ज्यामध्ये खुशीकौर कुमार, गायत्री देशमुख, तेजबिंदरकर परिहार, ऐश्वर्या येडे, गीता कुन्हे, पूजा खानजोडे, स्वप्नजा नरोटे, अश्विनी चंपाफुले, श्रुती घुगे, श्रुती गलाडे, भूमिका राठोड, वैष्णवी बनकर, पठाण सदरा, पायल राठोड व वसुंधरा कुटे यांचा समावेश होता.

# विद्यार्थिनीचा पाठलाग करुन फोटो व्हायरलची धमकी

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

मैत्रीचा गैरफायदा घेत एका १९ वर्षीय महाविद्यालयीन युवतीचा सतत पाठलाग करणे, प्रेमसंबंधासाठी बळजबरी करणे आणि नकार दिल्यास फोटो व्हायरल करण्याची धमकी देणे असे एका तरूणाला चांगलेच महागात पडले आहे. याप्रकरणी पीडित युवतीने दिलेल्या फिर्यादीवरून शिवगणेश राजू उगले (रा. निर्मलनगर, अहिल्यानगर) याच्यासह त्याचे वडील राजू उगले व आई ऋतुजा उगले यांच्याविरोधात तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


शहरातील एका महाविद्यालयात सन २०२४ मध्ये फिर्यादी युवती शिक्षण घेत असताना तिची ओळख शिवगणेश उगले याच्याशी झाली. सुरूवातीला मैत्रीचे नाते असताना शिवगणेशने युवतीकडे प्रेमाचा तगादा लावला. तिने वारंवार नकार देऊनही त्याने तिचा पाठलाग केला.

# राहुरीत १२ प्रभागात ३८ मतदान केंद्र; एकही अर्ज दाखल नाही

**राहुरी : (समर्थ गांवकरी)**

राहुरी नगरपालिका निवडणूकीसाठी बारा प्रभागात 38 मतदान केंद्रांवर 150 कर्मचारी व 50 अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली असून तिसऱ्या दिवशी बुधवारपर्यंत एकही अर्ज दाखल झालेला नव्हता .

हरलयान दरम्यान , आचारसंहिता काळात नियमांचे पालन करून मतदानाचा टक्का वाढवा-निवडणूक निर्णय अधिकारी- श्री. अनुपसिंह यादव यांनी केले आहे. राहुरी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात झाली असुन, दरम्यान, निवडणुकीसाठी प्रशासनाने तयारी केली आहे. आचारसंहिता




भंगाच्या तक्रारीसाठी स्वतंत्र कक्ष स्थापन झाला आहे.

आचारसंहिता काळात नियमांचे पालन करा, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी सहायक निवडणूक अधिकारी श्री. अनुपसिंह यादव, तसेच सहा. निवडणूक निर्णय अधिकारी श्री. नामदेव पाटील, सहा. निवडणूक निर्णय अधिकारी श्री. अभिजित हराळे यांनी दिली.

राहुरी नगरपरिषद निवडणूक २ डिसेंबर रोजी होणार आहे . अर्ज दाखल करण्यासाठी उमेदवारांना ११ प्रकारची कागदपत्रे जोडावी लागणार आहेत. शपथपत्र, मतदारयादीतील क्रमांकाची प्रत, बँक पासबुक छायाप्रत, अनामत रकमेची पावती, घोषणापत्र, अपत्याबाबत स्वयंघोषणा, गुन्हेगारी पार्श्वभूमी नसल्याचे नोटरीकृत प्रमाणपत्र, राखीव जागेसाठी जात वैधता प्रमाणपत्र, निवडणूक खर्चाबाबत हमीपत्र व नगपंचायत थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र यांचा यामध्ये समावेश आहे. नामनिर्देशनपत्र दाखल करताना केवळ प्रतिनिधी व सूचक यांनाच प्रवेश दिला जाणार आहे. राहुरी नगरपरिषद निवडणुकीसाठी, पक्षाच्या उमेदवाराला एक, तर अमान्यताप्राप्त पक्ष किंवा अपक्ष उमेदवाराला पाच सूचक आवश्यक आहेत. सूचक संबंधित प्रभागातील मतदार असणे आवश्यक आहे. एक सूचक एकाच उमेदवारी अर्जावर स्वाक्षरी करू शकतो; अन्यथा पहिला अर्ज ग्राह्य धरला जाणार आहे.

राहुरी शहरातील १२ प्रभागामध्ये पुरेशा प्रमाणात अतिरिक्त मतदान केंद्र उभारण्यात आली आहे त्यामुळे शहरात मतदारांना या सुविधेमुळे जास्त त्रास होणार नाही. शहरातील एकूण ३८ मतदान केंद्रासाठी एकुण १५० कर्मचारी व ५० अधिकारी नेमेलेले आहेत. नामनिर्देशनपत्रासोबत जोडलेल्या कागदपत्रांची पडताळणी करण्यासाठी स्वतंत्र कक्ष स्थापला आहे. मतदान केंद्रांसह विविध पथकांसाठी त्यांना जबाबदारी ठरवून दिली आहे. मा.राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य, यांच्या दि. २९ ऑक्टोबर २०२५ च्या आदेशनुसार क वर्ग नगरपरिषदसाठी थेट नगराध्यक्ष पदासाठी खर्च मर्यादा ७.५० लाख आहे, तर नगसेवकपदासाठी २.५० लाख आहे. यापेक्षा जास्त खर्च झाल्यास उमेदवार अपात्र ठरवला जाणार जाईल. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची सुविधा राहुरी नगरपरिषद कार्यालय, बिल्डींग, दुसऱ्या मजल्यावर उपलब्ध करून देण्यात आली आहे, यासाठी कक्ष देखील स्थापन करण्यात आला आहे. इच्छुक उमेदवारानी दि. १७ नोव्हेंबर २०२५ पर्यंत दुपारी ३.०० वाजेपर्यंत उमेवारी अर्ज दाखल करावा. उमेदवारी अर्ज दाखल करताना उमेदवारासह केवळ तीन व्यक्तींनाच प्रवेश दिला जाणार आहे. मतदान केंद्रावर दिव्यांग मतदारासाठी सुविधा देण्यात येणार आहे, मागील तीन दिवसात एकही अर्ज दाखल झाला नाही अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी श्री. अनुपसिंह यादव यांनी दिली.

# हुतात्मा राजगुरु सोशल फाउंडेशनतर्फे मदतीचा हात

**राजगुरुनगर : (समर्थ गांवकरी)**

राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरु सोशल फाउंडेशनतर्फे सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्यातील वीरवडे बुद्रुक गावातील पूरग्रस्त कुटुंबांना मदत देऊन हातभार लावला. यासाठी सोलापूर येथील पाटबंधारे विभागात कार्यरत असणारे अधिकारी राजगुरूनगरचे सुपुत्र प्रशांत कडूसकर यांनी उपक्रमाचे नियोजन केले. समाजपयोगी कामासाठी नेहमी अग्रेसर असणारी राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरु सोशल फाउंडेशन दिन दुबळ्या गरिबांसाठी वरदान आहे.




या फाउंडेशनच्या माध्यमातून अनेक गोर गरिबाना मदतीचा हात दिला आहे.पुरामुळे उध्वस्त झालेल्या सोलापूर जिल्ह्यातील वीरवडे बुद्रुक गावातील कुटुंबांना खेड तालुक्यातील नागरिकांकडून मिळालेल्या देणगीच्या स्वरूपात मिळालेल्या निधीतून हुतात्मा राजगुरु फाउंडेशनने शंभर पूरग्रस्त कुटुंबांना एक ते दोन महिने पुरेल एवढ्या किराणा किट चे वाटप करण्यात आले. या साठी हुतात्मा राजगुरु सोशल फाउंडेशनच्या उपाध्यक्षा नाजनीन शेख, सचिव अमर टाटीया, संचालक संतोष सांडभोर, दिलीप होले, ॲड. मनीषा पवळे, ॲड. साधना बाजारे, ॲड. सचिन वाळुंज, ॲड. सुनील वाळुंज, उत्तम राक्षे, प्रियांका दिघे, आकाश बोंबले,यांचा सक्रिय सहभाग होता. वीरवडे बुद्रुक गावचे सामाजिक कार्यकर्ते जयसिंग आवताडे, दीपक पवार, रामचंद्र पाटील पूरग्रस्त गावातील गावकऱ्यांना आवश्यक साहित्य सुपूर्द केले. फाऊंडेशन च्या या सामाजिक उपक्रमाचे स्थानिक ग्रामस्थांनी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी कौतुक केले असून, या मदतीमुळे अनेक कुटुंबांना दिलासा मिळाला असल्याने समाधान व्यक्त केले.




नांदेड : नांदेड भूषण सत्कार योग श्रीमान संत बाबा बलविंदरसिंघ महाराज (महान संत, गुरुद्वारा लंगर साहिब नांदेड) यांच्या हस्ते आणि नांदेड चे लोकप्रिय खासदार प्रा रवींद्र चव्हाण, आ बालाजी कल्याणकर, माधवराव पटणे अध्यक्ष,शिवमंदिर ट्रस्ट चैतन्यनगर नांदेड, माजी महापौर आनंद चव्हाण, ज्येष्ठ साहित्यिक प्रा डॉ जगदीश कदम,जिल्हा कॉंग्रेस पार्टीचे अध्यक्ष राजेश पावडे, जिल्हा परिषद चे माजी अध्यक्ष संभाजीराव धुळगंडे, किशोर भवरे,ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते धर्मभुषण दिलीप ठाकूर, प्रा एस टी बोखारे,रंगनाथराव वाघ, मनोहर पाटील भोसीकर,नानक साई फाऊंडेशन चे उपाध्यक्ष सर्व सुभाष बल्लेवार,तुलसीदास भुसेवार,जी नागय्या, विनायक पाथरकर,सेक्रेटरी सौ प्रफुल्ला पंढरीनाथ बोकारे, संयुक्त सचिव श्रेयस कुमार बोकारे यांच्या सह आपल्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा झाला.. उपस्थित राहून सहकार्य केले त्याबद्दल पंढरीनाथ बोकारे आम्ही आपल्या चेअरमन नानाक साई फाऊंडेशन नांदेड च्या वतीने सर्वांचे आभारी आहोत .

## थोडक्यात बातम्या...

### भाजपाची उमेदवारी मीळाल्यास सर्व ताकदीशी तयार मनोज मोरे टाकळीकर



**नायगाव (स. गांवकरी) :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा बिगुल वाजताच नायगाव तालुक्यातील बरबडा जिल्हा परिषद गटात राजकीय तापमान चढले आहे. हा गट खुल्या प्रवर्गासाठी खुला झाल्याने इच्छुकांची लगबग सुरू झाली असली तरी, भाजपच्या गोटात मनोज पाटील मोरे टाकळीकर या नावाची जोरदार चर्चा रंगत आहे. ग्रामपातळीवर कार्यकर्त्यांची भक्कम माळ विणणारे मनोज पाटील मोरे यांनी गावोगावी संपर्क दौरे सुरू केले आहेत. शिवारातील शेतकरी, तरुणाई, महिलावर्ग आणि ज्येष्ठ नागरिक यांच्या भेटीगाठी घेत त्यांनी 'घरोघरी कमळ' फुलविण्याचा संकल्प केला आहे. त्यांच्या सभांमध्ये दिसणारा उत्साह आणि गर्दी पाहून प्रतिस्पर्धी गटांतही अस्वस्थता निर्माण झाल्याचे बोलले जाते. अनेक वर्षांपासून पक्षनिष्ठ कार्यकर्ते म्हणून सक्रिय असलेल्या मोरे टाकळीकर यांनी सामाजिक, शैक्षणिक आणि विकासकामांत मोलाची भूमिका बजावली आहे. त्यामुळे "या वेळी स्थानिक आणि निष्ठावंत कार्यकर्त्याला संधी द्या" अशी मागणी बरबडा, वजीरगाव, टाकळी, कहाळा आणि परिसरातील जनतेकडून जोर धरत आहे. पक्षातील जाणकारांच्या म्हणण्यानुसार, जर मनोज पाटील मोरे टाकळीकर यांना उमेदवारी मिळाली, तर भाजपची ताकद या गटात दुपटीने वाढेल, तसेच कार्यकर्त्यांमध्ये नवा आत्मविश्वास व लढाऊ जिद्द निर्माण होईल. दरम्यान, बरबडा गटातील ही निवडणूक भाजपसाठी प्रतिष्ठेची ठरणार असल्याचे राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय बनला आहे. अनेकांच्या नजरा आता पक्षश्रेष्ठींवर असून, मोरे टाकळीकर यांच्या नावावर शिक्कामोर्तब होते का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### राजगुरुनगर नगरपरिषद निवडणुकीसाठी प्रचाराला वेग; चिन्हाचे आवाहन

**राजगुरुनगर (स. गांवकरी) :** दिवाळीपूर्वी जाहीर झालेल्या राजगुरुनगर नगरपरिषद निवडणुकीसाठी दोन डिसेंबर रोजी मतदान होणार असून, इच्छुक उमेदवारांकडून प्रचारयंत्रणा जोरात राबविली जात आहे. मात्र, २६ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या चिन्हवाटपानंतर अपक्ष उमेदवारांना कमी कालावधीत मतदारांपर्यंत चिन्ह पोहोचविण्याची मोठी कसरत करावी लागणार आहे. पाच वर्षांपेक्षा अधिक काळ प्रतीक्षेत असलेल्या नगरपरिषद निवडणुकीला अखेर मुहूर्त मिळाला आहे. निवडणुका जाहीर झाल्यानंतर शहरातील राजकीय वातावरण तापले असून, विविध प्रभागांमध्ये उमेदवार घराघरांत जाऊन मतदारांशी संवाद साधत आहेत. सोशल मीडियावरही प्रचारमोहीमांना वेग आला असून, बॅनर, पोस्टर आणि सोशल माध्यमांद्वारे उमेदवार आपली कामगिरी व विकासाचे आश्वासन मांडत आहेत. दरम्यान, मतदारांमध्येही उत्सुकतेचे वातावरण असून, या निवडणुकीत शहराच्या विकासासाठी कोणता उमेदवार पुढे येतो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. नगरपरिषद निवडणुकीसाठी १० ते १७ नोव्हेंबरदरम्यान उमेदवारी अर्ज दाखल होणार आहेत. त्यानंतर अर्जांची छाननी व माघारीची प्रक्रिया पूर्ण होईल. २६ नोव्हेंबर रोजी चिन्हवाटप झाल्यानंतर उमेदवार प्रचाराच्या अंतिम टप्प्यात उतरतील. विशेषतः अपक्ष उमेदवारांना २६ नोव्हेंबर ते १ डिसेंबर या अवघ्या काही दिवसांत आपले चिन्ह मतदारांपर्यंत पोहोचवावे लागेल. २०१४ साली स्थापन झालेल्या राजगुरुनगर नगरपरिषदेची ही दुसरी निवडणूक आहे. गेल्या पाच वर्षांहून अधिक काळ निवडणुका न झाल्याने नगरपरिषदेवर प्रशासक कार्यरत होते. या काळात नागरी समस्या सोडविण्यासाठी प्रशासनाचे प्रयत्न अपुरे ठरल्याने नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले.

# कॉंग्रेस – वंचित बहुजन आघाडी एकत्र : "सम-समान" च्या आधारावर आघाडीची घोषणा

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

नांदेड जिल्ह्यातील नगरपालिका आणि नगरपरिषद निवडणुकांसाठी कॉंग्रेस आणि वंचित बहुजन आघाडी यांच्यात ऐतिहासिक आघाडीची घोषणा करण्यात आली आहे. ही घोषणा खासदार रविंद्र चव्हाण आणि वंचित बहुजन आघाडीचे राज्य उपाध्यक्ष फारुक अहमद यांनी आज नांदेड येथे आयोजित संयुक्त पत्रकार परिषदेत केली.

या आघाडीचा पाया "सम-समान-" या तत्त्वावर आधारित असून, दोन्ही पक्षांनी



स्थानिक स्तरावर जनहित, सामाजिक न्याय आणि लोकशाही मूल्यांच्या रक्षणासाठी एकत्र येण्याचा निर्णय घेतला आहे.

आघाडी संदर्भातील जागावाटप व रणनीतीसंबंधी चर्चा बाळासाहेब आंबेडकर यांच्या सूचनेनुसार वंचितच्या राज्य समितीमार्फत जिल्हा स्तरावरील टीमच्या माध्यमातून पार पडली. चर्चेनंतर ठरविण्यात आले की, नांदेड जिल्ह्यात होऊ घातलेल्या १३ नगरपालिका आणि नगरपरिषद निवडणुकांमध्ये कॉंग्रेस आणि वंचित बहुजन आघाडी संयुक्तपणे लढणार असून, पुढील निवडणुकांसाठीही परस्पर चर्चा करून निर्णय घेण्यात येईल अशी माहिती या संयुक्त पत्रकार परिषदेत देण्यात आली.

पत्रकार परिषदेत ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्याचा विशेष उल्लेख करण्यात आला. "२ सप्टेंबर २०२५ च्या शासन निर्णयावर न्यायालयीन निर्णय येईपर्यंत, ओबीसींच्या राखीव जागा फक्त जुण्या ओबीसींनाच दिल्या जाव्यात." अशी वंचित आघाडीने ठाम भूमिका मांडली. सदरील मागणीला शरद पवार यांनी दुजोरा दिल्याचा उल्लेखही यावेळी करण्यात आला . दोन्ही पक्षांनी सामाजिक समतेच्या भूमिकेला साथ देण्याचा निर्णय यावेळी घेतला आहे.

या पत्रकार परिषदेला कॉंग्रेसकडुन खा. रविंद्र चव्हाण, वंचितचे राज्य उपाध्यक्ष फारुक अहमद, वंचितचे जिल्हाध्यक्ष शिवा नरंगले, माजी जिल्हाध्यक्ष प्रशांत इंगोले, माजी आमदार ईश्वरराव भोसीकर, कॉंग्रेसचे दक्षिण जिल्हाध्यक्ष हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, उत्तर जिल्हाध्यक्ष राजेश पावडे, महानगर अध्यक्ष अब्दुल सत्तार, अनिल मोरे, माजी उपमहापौर आनंद चव्हाण,प्रवक्ते मुंतजीब, बापूसाहेब पाटील वंचितचे महासचिव श्याम कांबळे , महानगर अध्यक्ष विठ्ठल गायकवाड, अमृत नरंगलकर, कैलास वाघमारे, आकाश जोंधळे, वैभव लष्करे, साहेबराव पंडित , सादिक बाचोटीकर, शुक्लोधन गायकवाड, नागेश धुतमल, अभय सोनकांबळे, कनिष्क सोनसळे, आदीसह दोन्ही पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नुकसानग्रस्त शेतकऱ्याची विष पिऊन आत्महत्या


**मुरबाड : (समर्थ गांवकरी)**

परतीच्या प्रवासाने तालुक्यातील शेतकऱ्याचे अतोनात नुकसान झाले असून शेतकऱ्याचे हातातोंडाशी आलेला घास हिरावला जात असल्याने तालुक्यातील जायगाव येथील एका ५२ वर्षे शेतकऱ्याने तण नाशक हे विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केली आहे. शेतकऱ्यांना अद्यापही नुकसान भरपाई मिळाली नसल्याने कष्टकरी शेतकऱ्यांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. महाराष्ट्रात झिनी या सुप्रसिद्ध लहान चवदार तांदळासाठी सुप्रसिद्ध असणाऱ्या मुरबाड तालुक्यातील शेतकऱ्यांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. बहुतेक शेतकरी वर्षातुन एकच पिक घेत असल्याने तो वर्षभर काबाडकष्ट करून मिळालेल्या उत्पन्नातून आपल्या परिवाराला लागेल ते धान्य ठेऊन घेतो आणि राहिलेले धान्य विकून त्यावर आपल्या परिवाराची गुजराण करतो.यावर्षी समाधानकारक पावसामुळे शेतकऱ्याला भरघोस पिक आले होते. हा हातातोंडाशी आलेला घास केव्हा एकदा शेतातुन खळ्यात येतो आणि खळ्यातुन घरात येतो या विवंचनेत शेतकरी असताना ही घटना घडली.

# सहा वर्षाच्या मुलीला बिबट्याने सर्वांसमोर उचलून नेले

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

घरासमोर अंगणात शेकोटी करुन शेकत असलेल्या लोकांतून सहा वर्षाच्या चिमुरडीला बिबट्याने आई व इतर कुटूंबातील लोकांसमोरुन उचलून नेल्याची घटना बुधवारी (ता. १२) सायंकाळी खारेकर्जुने (ता. अहिल्यानगर) येथे घडली. घटनेनंतर परिसरातील नागरिकांनी रात्री उशिरापर्यंत चिमुरडीचा शोध घेतला परंतु चिमुरडी सापडू शकली नाही. रियंका सुनील पवार (वय ६) असे त्या चिमुरडीचे नांव . अहिल्यानगर जिल्ह्यात बिबट्याचा धुमाकुळ सुरुच आहे. मंगळवारी (ता. ११) पहाटे अज्ञात वाहनाच्या धडकेने अहिल्यानगर-पुणे



रस्त्यावर चास-कामरगाव (ता. अहिल्यानगर) शिवारात एका बिबट्याचा मृत्यु झाला, कोपरगाव तालुक्यातही आठ दिवसात दोन बळी बिबट्याने घेतले आहे.

आता अहिल्यानगर तालुक्यातील खारेकर्जुने येथे सहा महिन्याच्या मुलीचा बिबट्याने बळी घेतला आहे.

स्थानिक नागरिकांकडून मिळालेली माहिती अशी की, बुधवारी (ता. १२) सायंकाळी सातच्या सुमारास रियंका पवार ही आई व इतर सदस्यांसोबत घराच्या अंगणात शेकोटी करुन शेकत होते. बिबट्याने लोकांतून रियंकावर झडप घातली. तिची आर्त किंकाळी ऐकून आई व इतर सदस्यांनी आरडाओरड करत तिच्याकडे धाव घेतली. मात्र सर्वांदेखत वेगाने बिबट्या चिमुरड्या रियंकाला उचलून तुरीच्या शेतात पळाला. बिबट्याचा पाठलाग केला मात्र, काही क्षणांत तो रियंकाला घेऊन तुरीच्या शेतात गायब झाला. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिक जमा झाले.

रात्री उशिरापर्यंत संपूर्ण तुरीचे शेत पिंजून काढले. मात्र, रियंकाचा शोध लागला नव्हता. खारेकर्जुने हे गाव अहिल्यानगर शहरापासून जवळ आहे.

एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक, पथकासह घटनास्थळी दाखल झाले तर. वन विभागाचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. रात्री उशिरापर्यंत ड्रोनच्या सह्याने वन विभागाचे कर्मचारी व पोलीस पथक चिमुरडीचा शोध घेत होते. परंतु तिचा शोध लागू शकला नाही. अनेक दिवसापासून अगोरदपासून कर्जुनेखारे परिसरात बिबट्याचा वावर सुरु आहे.

# नगरसेवक संख्या ८१ : महिलांसाठी ४१ जागा राखीव तर पुरुष साठी ४० जागा राखीव

**नांदेड जिल्हा (समर्थ गांवकरी)**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या येणाऱ्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज प्रभाग नियम आरक्षण सोडत काढण्यात आली असून यामध्ये २० प्रभागातील ८१ नगरसेवकांसाठी ही सोडत होती यापैकी ४१ जागा महिलांसाठी राखीव ठेवण्यात आल्या तर पुरुषासाठी ४० जागा राखीव ठेवण्यात आल्या या सर्व आरक्षण सोडतीचे पारदर्शकपणे लहान बालकाच्या हस्ते चिट्ठी पद्धतीने आरक्षण सोडत जाहीर करण्यात



आली. नांदेड येथील डॉक्टर शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह येथे मनपाचे आयुक्त डॉक्टर महेश कुमार डोईफोडे अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम उपा आयुक्त अजितपाल सिंघ संधू यांच्या उपस्थितीत निवडणूक प्रभागाचे प्रभारी अधिकारी नितीन गाढवे यांनी आरक्षणाचा सर्व मसुदा मांडला २०११ च्या लोकसंख्येनुसार नांदेडची लोकसंख्या ५ लाख ५० हजार ४३९ एवढी आहे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या एकूण २० प्रभागात ८१ नगरसेवक उमेदवार निवडून द्यायचे असून त्यातील ४१ महिला आहेत यामध्ये एकूण प्रभाग २० आहेत १९ प्रभागात चार नगरसेवक संख्या आहे तर प्रभाग क्रमांक २० मध्ये पाच नगरसेवक निवडून द्यायचे आहेत प्रभाग निहाय आरक्षण पुढीलप्रमाणे भाग क्रमांक १) अनुसूचित जाती महिला व नागरिकांचा मागास प्रवर्ग सर्वसाधारण महिला ड सर्वसाधारण पुरुष प्रभाग क्रमांक २) अनुसूचित जाती महिला व नागरिकांचा मागास प्रवर्ग क सर्वसाधारण महिला ड सर्वसाधारण पुरुष प्रभाग क्रमांक ३) अनुसूचित जाती महिला व नागरिकांचा मागासवर्व सर्वसाधारण महिला ड सर्वसाधारण पुरुष प्रभाग क्रमांक ४) अनुसूचित जाती पुरुष व अनुसूचित जमाती महिला क सर्वसाधारण महिला ड सर्वसाधारण पुरुष प्रभाग क्र ५) अनुसूचित जाती पुरुष व नागरिकांचा मागासपरवर महिला क सर्वसाधारण महिला ड सर्वसाधारण पुरुष प्रभाग क्रमांक ६) अनुसूचित जाती महिला व नागरिकांचा मागास करून सर्वसाधारण महिला ड सर्वसाधारण पुरुष प्रभाग क्रमांक ७) अनुसूचित जाती पुरुष व नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला व सर्वसाधारण महिला ड सर्वसाधारण पुरुष प्रभाग क्रमांक ८) अ अनुसूचित जाती पुरुष व नागरिकांचा मागासवर्ग महिला क सर्वसाधारण महिला ड सर्वसाधारण पुरुष प्रभाग क्रमांक ९) व अनुसूचित जाती महिला व नागरिकांचा मागास करून पुरुष सर्वसाधारण महिला ड सर्वसाधारण पुरुष प्रभाग क्रमांक १०) अ अनुसूचित जाती पुरुष व नागरिकांचा मागास पर्व महिला क सर्वसाधारण महिला ड सर्वसाधारण पुरुष प्रभाग क्रमांक ११) व नागरिकांचा मागास बरोबर व सर्वसाधारण महिला क आणि ड सर्वसाधारण पुरुष प्रभाग क्रमांक १२) व नागरिकांचा मागास प्रवर्ग पुरुष व आणि क सर्वसाधारण.

# शेतकऱ्यांच्या खाजगी जागेवरील 'वने 'शेरा काढून टाकण्याचा सर्वोच्च न्यायालयाचा आदेश

## महाराष्ट्रातील लाखो शेतकऱ्यांना दिलासा

महाराष्ट्र राज्यातील मुख्य सचिवांनी विभागीय आयुक्तांना हे आदेश दिले व ठाणे, नासिक, पुणे या विभागीय आयुक्तांनी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना अशा क्षेत्राच्या सातबारावर वन म्हणून नोंद घेण्याबाबत कळविले व त्यानुसार महाराष्ट्र राज्यातील सुमारे अडीच लाख हेक्टर खाजगी जमिनीवर वन म्हणून नोंद झाली आहे आता राज्य शासनाने सर्वोच्च न्यायालयाचे आदेशाप्रमाणे एक शासन निर्णयच घ्यावा व शेतकऱ्यांच्या जमिनीवरील वन संज्ञा काढून टाकावी असा आदेश न्यायालयाने दिला आहे

**मुरबाड : (समर्थ गांवकरी)**

ठाणे जिल्हा सह महाराष्ट्र राज्यातील शेतकऱ्यांच्या खाजगी जागेवर शासनाने लावलेला वने हा शेरा काढून टाकण्याचा आदेश सर्वोच्च न्यायालयाने नुकताच 7 नोव्हेंबर रोजी दिल्यामुळे लाखो शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे या आदेशाची लवकरात लवकर अंमलबजावणी करून शेतकऱ्याचे जमिनीवरील वनसज्ञा कायमची काढून टाकावी अशी मागणी शेतकरी करत आहेत

ठाणे जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी व सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी बाधित शेतकऱ्यांना जागृत केले व या सर्वांनी एकत्र येऊन वकिलामार्फत सर्वोच्च न्यायालयात हा खटला दाखल केला होता या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने हायकोर्टाचा निर्णय रद्द केला , खाजगी जंगलाच्या घोषणा रद्द केल्या , महसूल नोंदी जमिनी पुन्हा मूळ मालकाच्या नावे करण्याची दुरुस्ती करण्याचे आदेश दिले , शासनाला पुन्हा प्रक्रिया करायची असल्यास ती कायद्याने व सर्व प्रक्रिया पूर्ण करूनच करावी असा निकाल न्यायालयाने दिला आहे अशी माहिती सह्याद्री परिसर शेतकरी संघाच्या पदाधिकाऱ्यांनी दिली वनविभागाचे सेवानिवृत्त अधिकारी किशोर ठाकरे , चंद्रकांत शेळके यांच्यासह



अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी यासाठी जोरदार प्रयत्न केले होते

भारतीय वन अधिनियम 1927 चे, "कलम 35" मधील तरतुदीनुसार राज्य शासनास कोणतेही खाजगी मालकीचे क्षेत्र वनसंवर्धनासाठी संपादित करता येते याचा आधार घेऊन 1995 साली महाराष्ट्र राज्यातील हजारो हेक्टर खाजगी जमिनीवर वने ही संज्ञा लावण्यात आली आहे यामुळे शेतकऱ्याची खाजगी मालकीची जमीन असून सुद्धा त्यावर कोणतेही काम करता येत नव्हते त्यावरचे झाडोरा तोडायला परवानगी मिळत नव्हती शासनाने वन अधिनियमानुसार शेतकऱ्यांच्या खाजगी मालकीच्या जमिनीवर वन सज्ञा लागू केली आहे परंतु त्यासाठी अवलंबिण्यात येणारी कायदेशीर प्रक्रिया नियमानुसार पार पडलेली नव्हती असे अपील करणाऱ्या शेतकऱ्यांनी सर्वोच्च न्यायालयात केलेल्या अपिलात म्हटले होते त्याचा निकाल नुकताच लागला पन्नास-साठ वर्षांपूर्वी काढलेली नोटीस ही आता मृत झालेली आहे व तिच्या आधारे सातबारावर वन म्हणून घेण्यात येणारी नोंद ही चुकीची आहे शासनाने ती नोंद ताबडतोब काढून टाकावी असे स्पष्ट आदेश सर्वोच्च न्यायालयाने त्या निर्णयांमध्ये दिले असे याचिका कर्ते किशोर ठाकरे यांनी सांगितले

भारतीय वन अधिनियम 1927 चे कलम 35(3) अन्वये महाराष्ट्र राज्यातील सुमारे दोन लाख 50 हजार हेक्टर क्षेत्राचे मालक असलेल्या 40 हजार शेतकऱ्यांच्या नावे राज्य शासनाचे वनविभागाने सन 1950 ते 1965 या काळात ज्या जमिनीवर झाडोरा आहे त्यांचे सातबारा उताऱ्यावर वने अशी नोंद करण्याबाबत नोटीस काढल्या होत्या हे क्षेत्र पूर्णपणे खाजगी मालकीचे आहे मात्र ह्या नोटिसेस राज्य शासनाने फक्त कागदोपत्री काढल्या प्रत्यक्षात त्या संबंधित जमीन मालकास बजावण्यात आल्याच नाहीत मुळ जमिन मालकास अशी काही नोटीस बजावण्यात आली होती अस आजचा त्या जमिनीचा मालक म्हणजे जुन्या मूळ जमीनदारचा मुलगा, नातू, पणतू किंवा विकत घेणारा मालक ह्यापैकी कोणीही सांगू शकत नाही असे म्हणणे याचिकेत मांडण्यात आले होते नोटीस काढून झाल्यावर राज्य शासन गप्प राहिले. सन 1969 साली राज्य शासनाने ह्या कलम 35 अन्वये काढलेल्या नोटिसेस रद्द करण्याबाबत एक शासन निर्णय घेतला त्याची अंमलबजावणी करण्यासाठी परिपत्रक काढले प्रधान मुख्य वनसंरक्षक पुणे यांना आदेश काढले. परंतु प्रधान मुख्य वनसंरक्षक यांचेकडून पुढील परिपत्रक निघालेच नाही. त्यानंतर 1975 साली राज्य शासनाने महाराष्ट्र वन (संपादन) अधिनियम 1975 हा कायदा पारित केला. या अधिनियमानुसार कलम 2 खाजगी वनाची व्याख्या केली आहे. खाजगी वन म्हणजे ज्या कोणत्याही खाजगी जमिनीस भारतीय वन अधिनियम 1927 कलम 35 (3) नोटीस लागलेल्या किंवा कलम 35 (1)ची अंतिम नोटीस लागलेले किंवा कलम 37 , 38 च्या नोटीस लागलेले आहेत असे क्षेत्र खाजगी वन होते व असे क्षेत्र या अधिनियमाच्या कलम 3 नुसार मानीव राखीव वन होते हा कायदा केल्यानंतर सुद्धा हे खाजगी जमीन क्षेत्र खातेदाराच्या / मूळ जमीन मालकाच्या ताब्यातच राहिली व ते घ्यायला वनविभागाचा अधिकारी कधी गेला नाही. सन 1996-2000 दरम्यान एका स्वयंसेवी संघटनेने उच्च न्यायालयात केस दाखल केली.

या केस मध्ये न्यायालयाने शासनाची बाजू उचलून धरत निर्णय दिला की या क्षेत्राला 35(3) लागलेले आहे ते क्षेत्र वन होते व अशा सर्व क्षेत्राच्या सातबारा उतारा वर वन म्हणून नोंद होणे आवश्यक आहे, म्हणजे त्याची विक्री होणार नाही किंवा इतर फेरफार होणार नाहीत. असे आदेश न्यायालयाने दिले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# चोरी करणारा सराईत चोरटा नारायणगाव पोलिसांकडून जेरबंद


**नारायणगाव: (समर्थ गांवकरी)**

ऐन दिवाळीत घरफोडी चोरीचे गुन्हे करणाऱ्या सराईत चोरट्यास स्थानिक गुन्हे शाखा व नारायणगाव पोलीस स्टेशन पुणे ग्रामीण पोलिसांनी अटक करून त्याच्याकडून ३ गुन्हे उघडकीस आणून सुमारे १६ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने ,८४१ ग्रॅम वजनाचे चांदीचे दागिने ,रोख रक्कम ,मोटार सायकल असा एकूण १४ लाख ३७ हजार ६५० रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे .नारायणगाव (ता .जुन्नर ) येथील विटेमळ्यात राहणारे विष्णू भागुजी सांगडे (वय ६२ वर्ष ,रा




.वैभवलक्ष्मी सोसायटी ए .विंग तिसरा मजला फ्लॅट नं .२१ )हे १४ ऑक्टोबर २०२५ रोजी घराला कुलूप लावून नारायणगाव येथील मंदिरात काकडा आरतीसाठी गेले असताना पहाटेच्या सुमारास आरोपी विशाल दत्तात्रय तांदळे (वय 28 वर्ष रा. मंचर, ता. आंबेगाव, जि. पुणे, मूळ रा. पाटेगाव, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर याने

घराचा कडी कोयंडा तोडून घरात प्रवेश करून बेडरूममधील लाकडी कपाटातून ११ लाख २० हजार रुपये किंमतीचे सोन्या चांदीचे दागिने लंपास केले होते .त्याअनुषंगाने सांगडे यांनी नारायणगाव पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद नोंदवली होती. स्थानिक गुन्हे शाखा व नारायणगाव पोलिसांनी घटनास्थळाची व आजूबाजूच्या परिसराची पाहणी करून सीसीटीव्ही फुटेज तपासून व गोपनीय माहितीच्या आधारे आरोपी विशाल तांदळे याला सापळा रचून नारायणगाव पोलिसांनी जेरबंद केले आहे. आरोपीवर यापूर्वी मालमत्ता चोरीचे २८ गुन्हे दाखल असून सदरचा गुन्हाही त्यानेच केला असल्याचे सांगितले .आरोपी सध्या न्यायालयीन कोठडीत आहे .सदरची कामगिरी ही पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल ,अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे ,जुन्नर उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील ,यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर ,नारायणगाव पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक प्रवीण सपांगे ,स्थानिक गुन्हे शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक महादेव शेलार ,पोलीस अंमलदार दीपक साबळे ,राजू मोमीन ,अक्षय नवले ,मंगेश लोखंडे ,सत्यम केळकर ,सोमनाथ डोके ,निलेश जाधव ,पोलीस सब इन्स्पेक्टर सोमेश्वर शेटे ,यांनी केली आहे.



शिवनेरी : श्री क्षेत्रपाल कालभैरवनाथ जयंती उत्सव निमित्त सुवर्ण महोत्सवी अखंड हरिनाम सप्ताह खानगांव येथे वारकरी संप्रदायाचा गजर ग्रामस्थांच्या माध्यमातून होत आहे . असे गौरव उद्गार ह भ प ज्येष्ठ तुकाराम दुराफे यांनी बुधवार दिनांक १२ रोजी सांगितले.

## थोडक्यात बातम्या...



### ऑर्केस्ट्रा कलाकार असोसिएशनच्या तालुकाध्यक्ष पदी राजीव बोरसे

रावेर (स. गांवकरी) : जळगाव येथे नुकतीच जळगाव जिल्हा आर्केस्ट्रा कलाकार असोसिएशनची बैठक जिल्ह्याचे अध्यक्ष मोहन तायडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी ऑर्केस्ट्रा कलाकार असोसिएशनच्या रावेर तालुका अध्यक्षपदी निंभोरा तालुका रावेर येथील राजीव तुकाराम बोरसे यांची एक मताने सर्व पदाधिकाऱ्यांनी नियुक्ती केली. याप्रसंगी विजयकुमार कोसोदे. अमित माळी. मोहन गारुंगे तुषार वाघुळदे, शाम जगताप, बाळू पाटील, दिलीप पाटील, शेषराव परमार , युवराज सोनवणे ,रमेश गोयर या सह आधी उपस्थित होते याप्रसंगी मोहन तायडे विजय कुमार कासोदे यांनी बोरसे यांना नियुक्तीपत्र देऊन त्यांचा सत्कार केला. या निवडीबद्दल झाल्याबद्दल माजी खासदारडॉ.उल्हासपाटील ,खासदार स्मिताताई वाघ, आमदार अमोल भाऊ जावळे, आमदार चंद्रकांत भाऊ पाटील, माजी आमदार अरुण दादा पाटील,माजी आमदार शिरिषदादा चौधरी,माजी जि प अध्यक्ष अशोक भाऊ कांडेलकर, डॉ. केतकी पाटील, प्रल्हाद पाटील नंदकिशोर महाजन, श्रीकांत महाजन,डॉ.संदीप पाटील, धनंजय चौधरी विवेक ठाकरे ,हरलाल कोळी ,दीपक पाटील, कडू चौधरी ,प्रल्हाद बोंडे,दिगंबर चौधरी ,दुर्गादास पाटील, रोहिदास ढाके, नरेंद्र ढाके, प्रशांत पाटील, वासुदेव नरवाडे, दुर्गेश पाटील, प्रमोद चौधरी विनोद सोनवणे यांनी शुभेच्छा देऊन अभिनंदन केले आहे.

### जळगाव जिल्ह्यात थांडीचा जोर वाढल्याने भरीताच्या वांग्यांची मागणी वाढली

रावेर (स. गांवकरी) : राज्यभरात जळगाव जिल्ह्यात तपमानाचा पारा घसरून , ९ / २ अंशावर आल्याने प्रसिद्ध असलेल्या खांदेशातील भरीताच्या वांग्यांची मागणी वाढली आहे. विषेश बामणोद ता यावल येथिल वांग्यांना भरीत खवैयांची जास्त पसंतीसह मागणी वाढली आहे. यावल, भुसावल, मुक्ताई नगर , सह रावेर तालुक्यातही वांग्यांचे उत्पादन घेतले जाते. या भागात डिसेंबर जानेवारी महिण्यात खाजगी खवैये भरीताचा अस्वाद घेतातच परंतु बहुतेक ठिकाणी मोठ मोठ्या पार्थ्यांचेही आयोजन करण्यात येते . या पार्ट्यांसाठी नोकरी निमित्त पुण्या , मुंबईला गेलेले चाकरमानी गावाकडे येत असतात . मात्र कायम मे महिण्या पासून दर आठवडयाला पावसाची आवक सुरूच असल्याने उत्पादनात २५ टक्यांनी घट झाली असल्याचे वांगी उत्पादक शेतकऱ्यात बोलले जात आहे.

### सुवर्ण महोत्सवी अखंड हरिनाम सप्ताह मध्ये ग्रामस्थांचे एकीचे बळ

शिवनेरी (स. गांवकरी) : श्री क्षेत्रपाल कालभैरवनाथ जयंती उत्सव निमित्त सुवर्ण महोत्सवी अखंड हरिनाम सप्ताह मध्ये ग्रामस्थांचे एकीचे बळ पहावयास मिळाले असे बुधवार दि. १२ सकाळी ११ . वा उद्गार ह भ प डॉ. विकासनंदजी मिसाळ यांनी श्री कालभैरव जन्म सोहळा निमित्त कीर्तनात सांगितले. या अखंड हरिनाम सप्ताह मध्ये नित्यनेमाने दररोज १८०० ते २000 भाविकांचं उत्तम नियोजन ग्रामस्थांकडून सेवा होत आहे. ह भ प विकासानंदजी मिसाळ यांनी कीर्तनात आमच्या हें आलें भागा । जिव्हारा या जगाचे धरूनिया ठेलों जीवें । बळकट भावें एकविध ॥ १ ॥ या अभंगातून सांगितले की , आपल्या धर्माचे खरे नाव " सनातन वैदिक धर्म " आहे . याची आपण पाईक आहोत. देवतांचे ज्ञान महत्त्वाचे आहे .वेद प्रमुख ग्रंथ आहे. देव कसा आहे , वेदाने सांगितले आहे . वेद सांगतो शिव श्रेष्ठ आहे . असे विचार ह भ प डॉ. मिसळ यांनी श्री कालभैरवनाथ जन्म सोहळा निमित्त यावेळी भाविकांना सांगितले. यावेळी गावातील महिलांनी श्री कालभैरव जन्म सोहळा निमित्त सामूहिक पाळणा म्हणण्यात आला.

# आदिवासी भागात शासकीय योजना पोहोचविण्यासाठी कॅम्प

## टाकळी ढोकेश्वर गटाच्या नेत्या सोनियाताई राजदेव : वडगाव सावताळ येथे मोफत रेशन कार्ड शिबिर

**पारनेर: (समर्थ गांवकरी)**

ग्रामीण भागात शासकीय योजना पोहोचविण्यासाठी रेशन कार्ड हे महत्त्वाचे ओळखपत्र आहे. वडगाव सावताळ सारख्या आदिवासी भागात अनेक कुटुंबांना रेशन कार्ड नाही तसेच रेशन कार्ड च्याही समस्या आहेत.

आधार कार्ड पॅन कार्ड स्मार्ट कार्ड हे सर्व आवश्यक असलेले डॉक्युमेंट सर्वसामान्य जनतेला सहज उपलब्ध व्हावेत यासाठी विशेष कॅम्प वडगाव सावताळ सारख्या आदिवासी भागात आयोजित केला या त्यांच्या माध्यमातून लाभार्थ्यांना फायदा होणार आहे यापुढील काळातही असे कॅम्प घेऊन सर्वसामान्यांची



सेवा करणार असल्याचे टाकळी ढोकेश्वर जिल्हा परिषद गटाच्या नेत्या सोनियाताई रवींद्र राजदेव यांनी मत व्यक्त केले.

निलेश लंके प्रतिष्ठानाच्या वतीने आणि रविंद्र राजदेव यांच्या संकल्पनेतून तसेच सोनियाताई रविंद्र राजदेव यांच्या विशेष प्रयत्नांतून वडगाव सावताळ येथे मोफत रेशनिंग कार्ड शिबिर आणि श्रावणबाळ वृद्धापकाळ योजनेच्या लाभार्थ्यांसाठी विशेष कॅम्प आयोजित करण्यात आला होता.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते दीपक लंके, राष्ट्रवादीचे प्रवक्ते मोहनराव रोकडे यांच्या शुभहस्ते या शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी रविंद्र राजदेव, सोनियाताई राजदेव, सरपंच संजय रोकडे, दादाभाऊ रोकडे, हनुमंत विष्णू ठाणगे, सतीश तीखोळे, राजू रोकडे, सचिन जांभळकर, आदेश साळवे, बाबासाहेब भोबाळ, संदीप व्यवहारे, राजेंद्र भोसले, तुकाराम रोकडे, ज्ञानदेव रोकडे, दादाभाऊ गुंजाळ, सुभाष रोकडे, सुदाम पवार, सखुबाई साळवे, संतोष खरमाळे, संजय गोरडे, रामदास गांगुर्डे, गुलाब रोकडे, अशोक गोसावी, रोहित साळवे, बाबा जांभळकर, सुरेश पवार, चंद्रकांत झीटे, नांदूर पठारचे मा. सरपंच भानुदास आग्रे, अनिल पवार, गौतम रोकडे, भाऊसाहेब चौधरी, बाळासाहेब झावरे, प्रणव पानसरे, कैलास राजदेव, जनार्दन चौधरी, संदेश आग्रे, निलेश रांधवण, अविनाश रोकडे आदी मान्यवर उपस्थित होते.

राजदेव दांपत्य पारनेर तालुक्याच्या उत्तर भागातील टाकळी ढोकेश्वर परिसरामध्ये निलेश लंके प्रतिष्ठानच्या माध्यमातून विविध शासकीय योजना व आरोग्य शिबिर तसेच सेवा योजना या माध्यमातून ग्रामीण भागातील आदिवासी तसेच सर्वसामान्य जनतेची सेवा करत आहे या माध्यमातून सर्वसामान्य कुटुंबांना नक्कीच फायदा होणार आहे.
**- मोहनराव रोकडे (राष्ट्रवादी नेते)**

# घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत प्रशिक्षण व पिपीई किटचे वाटप

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

नांदेड वाघाळा महानगर पालिकेतील स्वच्छता कर्मचाऱ्यांना स्वच्छतेचे कामे करतांना त्यांच्या कामांची गुणवत्ता व कार्यक्षमता वाढावावी या करीता, स्वच्छतेच्या कामा विषयी व घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत १२ नोव्हेंबर रोजी प्रशिक्षण देण्यात आले. शहरातील स्वच्छता अबाधित ठेवण्याचा भार हा स्वच्छता व आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांवर असतो, स्वच्छता कर्मचाऱ्यांची स्वच्छतेचे कामे करतांना त्यांचा कामांची गुणवत्ता व कार्यक्षमता वाढावी याकरीता, ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट, छ.संभाजी नगर या संस्थेकडुन महानगरपालिके मार्फत दि. १२ व १३ नाव्हेंबर रोजी असे दोन दिवस प्रभाग निहाय प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. सदरील प्रशिक्षणाचे अध्यक्ष, डॉ. महेशकुमार डोईफोडे, आयुक्त, नांवामशनपा नांदेड यांचे हस्ते उद्घाटन करण्यात आले. प्रशिक्षण उद्घाटनानंतर आयुक्त यांनी स्वच्छता कर्मचाऱ्यांना स्वच्छता व स्वच्छता कामाचे महत्व व स्वच्छतेचे काम करीत असतांना घ्यावयाची काळजी या बाबत मोलाचे मार्गदर्शन केले.

# मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट संचालित वाचनालय उपक्रम स्तुत्य

## शिक्षणाधिकारी श्रीमती संध्या गायकवाड

**निघोज : (समर्थ गांवकरी)**

मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टने वाचनालय उपक्रम हाती घेऊन या ठिकाणी स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत शैक्षणिक संस्कृतीला पाठबळ देण्याचा निर्णय घेत स्तुत्य उपक्रम राबवीला असून प्रत्येक वाचनालयात विद्यार्थी हिताचे निर्णय घेण्याची गरज असल्याचे प्रतिपादन शिक्षणाधिकारी श्रीमती संध्या गायकवाड यांनी व्यक्त केले आहे. त्यांनी नुकतीच मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टला सदिच्छा भेट दिली यावेळी वाचनालयातील स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा केली व समाधान व्यक्त केले. यावेळी मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त संतोषशेठ रसाळ यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी उपशिक्षणाधिकारी श्रीमती संध्या भोर, शिक्षण विस्तार अधिकारी वाव्हळ, विस्तार अधिकारी भिवसेन पवार, विस्तार अधिकारी पिंपरकर सर, प्राचार्य अंकुश अवघडे, पिंपळनेर विद्यालयाचे मुख्याध्यापक पवार सर, देवीभोयरे येथील अंबिका विद्यालयाचे प्राचार्य राजेंद्र वाघ, केंद्र प्रमुख बाचकर सर, मुलिका विद्यालयाचे उपप्राचार्य कैलास मोकळे, पर्यवेक्षक लक्ष्मणराव झंजाड, वरिष्ठ शिक्षक मेहबूब इनामदार, संभाजी बेलोटे, भास्कर काकडे, सुधीर धुणापुणे, श्रीकांत कवाद , मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट संचालित मळगंगा वाचनालयाचे प्रमुख अधिकारी शेळके साहेब, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे व्यवस्थापक महेश ढवळे आदी उपस्थित होते. शिक्षणाधिकारी श्रीमती गायकवाड यावेळी म्हणाल्या गेली दिड वर्षांपासून याठिकाणी वाचनालयाच्या माध्यमातून स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांना अभ्यासाची संधी उपलब्ध होत असून दररोज जवळपास आठ ते दहा तास साठ पेक्षा जास्त विद्यार्थी या वाचनालयाचा नियमीत लाभ घेत आहेत ही बाब कौतुकास्पद आहे. मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे सर्व पदाधिकारी व विश्वस्त मंडळ यांनी लोकसहभागातून अतिशय कार्यक्षमपणे सर्व व्यवस्था अधोरेखित ठेऊन वाचनालय सुरू केले आहे.स्पर्धा परिक्षा विद्यार्थ्यांना सर्व पुस्तके उपलब्ध करुण देऊन अभ्यास करण्यासाठी अतिशय सुसज्ज ईमारत सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून देऊन स्पर्धा परीक्षा विद्यार्थी या भागात मोठ्या प्रमाणात कशा प्रकारे केंद्र सरकार व राज्य सरकारमध्ये उच्च पदावर कार्यरत होतील यासाठी प्रयत्न केले आहेत.

# पाणी प्रश्नावर विखे कुटुंबाने पन्नास वर्षे झुलवत ठेवले : तरटे

- विखे पिता पुत्रांना लोकसभेतील पराभव पचवता आला नाही

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

गेल्या चाळीस वर्षांपासून विखे कुटुंबाने पारनेर तालुक्यातील जनतेला पाण्याच्या प्रश्नावर झुलवत ठेवले.विकासाऐवजी तालुक्यात गट तटाचे राजकारण करून स्वतःची पोळी भाजून घेतली.असे घणाघाती आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) तालुकाध्यक्ष बाबासाहेब तरटे



यांनी केले.पालकमंत्री राधाकृष्ण विखे आणि माजी खासदार सुजय विखे या पिता पुत्रांना लोकसभा निवडणुकीतील पराभव पचवता आलेला नाही,असे तरटे म्हणाले.

पालकमंत्री विखे यांनी निघोज (पारनेर) येथील कार्यक्रमात बोलताना,खासदार नीलेश लंके दडपशाहीचे राजकारण करीत असल्याचा आरोप केला. तालुक्यातील माफिया राज रोखण्यासाठी महायुतीला पाठबळ देण्याचे आवाहन विखे यांनी केले होते.विखे यांनी केलेल्या आरोपांचा तरटे यांनी माध्यमांशी बोलताना समाचार घेतला. तरटे म्हणाले की, पालकमंत्री विखे यांचे वडील, तत्कालीन खासदार बाळासाहेब विखे यांनी कुकडी प्रकल्पातील पाण्याचे अमिष दाखवत पारनेर तालुक्यातील जनतेच्या जीवावर चाळीस वर्षे सत्ता उपभोगली,विकासाच्या भूलथापा दिल्या.माजी खासदार डॉ.सुजय विखे यांनीही विकास कामांना प्राधान्य देण्याऐवजी गावागावात भांडणे लावण्याचे काम केले.त्याऐवजी केंद्रातील सत्तेचा वापर करून एखादे भरीव काम केले असते तर तालुक्यातील जनता त्यांची ऋणी राहिली असती. पारनेर तालुक्यातीलच नव्हे तर दक्षिण अहिल्यानगर जिल्ह्यातील जनतेने विखे पिता - पुत्रांना त्यांची जागा दाखवून दिली आहे.त्यामुळे सैरभैर झालेल्या विखे पिता पुत्रांना जळी स्थळी खासदार लंके दिसत आहेत.

पालकमंत्री विखे यांचे वडील, तत्कालीन खासदार बाळासाहेब विखे यांनी रांजणगाव मशीद परिसरातील शेतकऱ्यांना तेलबिया प्रकल्पाचे आमिष दाखवून जमीन लाटली आहे.या प्रकल्पाचे काय झाले.असा सवाल उपस्थित करतानाच विखे कुटुंबाने पारनेरमधील शेतकऱ्यांचा विश्वासघात केला असल्याचे तरटे यांनी म्हटले आहे.

निसर्गाचा लहरीपणा, अतिवृष्टीमुळे राज्यातील शेतकरी मोठ्या प्रमाणात अडचणीत आले आहेत.या पार्श्वभूमीवर महायुतीने निवडणुकीदरम्यान दिलेल्या आश्वासनानुसार संपूर्ण कर्जमाफी करणे आवश्यक आहे.मात्र विखेंसारख्या जबाबदार मंत्र्याने कर्जबाजारीपणा वरून शेतकऱ्यांची खिल्ली उडवणे म्हणजे त्यांच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखे आहे.विखे यांनी शेतकऱ्यांविरूध्द केलेल्या वक्तव्याबद्दल माफी मागावी.अन्यथा शेतकरी त्यांना माफ करणार नाहीत असा इशारा तरटे यांनी दिला आहे.

# एमआयटी एडीटी आणि ॲडमिशन सजेशन आयोजित करिअर गायडन्स सेमिनार संपन्न

## पिंपरी चिंचवड शहरातील शिक्षकांचा 'गुरु गौरव पुरस्कार' देऊन सन्मान

**पिंपरी चिंचवड : (समर्थ गांवकरी)**

एमआयटी एडीटी विद्यापीठ, पुणे आणि ॲडमिशन सजेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'बारावी नंतर पुढे काय?' या विषयावर मोफत करिअर गायडन्स सेमिनार आयोजित करण्यात आला होता. या सेमिनारला विद्यार्थ्यांचा, शिक्षकांचा तसेच पालकांचा प्रचंड प्रतिसाद लाभला. तसेच या निमित्ताने पिंपरी चिंचवड शहरातील तज्ञ शिक्षकांना 'गुरु गौरव पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले.

या सेमिनार मध्ये विद्यार्थ्यांना एमआयटी एडीटी विद्यापीठाचे विद्यार्थी कार्य चे सहाय्यक संचालक डॉ. उल्हास माळवदे व सहाय्यक प्राध्यापक डॉ. नंदकिशोर कार्लेकर आणि ॲडमिशन सजेशनचे संचालक अक्षय कुमार भंडारी यांचे मार्गदर्शन लाभले. बारावी नंतर पुढे काय? या विषयावर मान्यवरांनी आपापले मनोगत व्यक्त करत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रम मंगळवार दि. ११ नोव्हेंबर २०२५ रोजी ग. दि. माडगूळकर नाट्यगृह, निगडी येथे संपन्न झाला. यावेळी विविध कोचिंग क्लासेसचे उपस्थित विद्यार्थी, शिक्षक, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी डॉ. उल्हास माळवदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बारावी नंतर पुढे काय? याबद्दल माहिती देत बारावी नंतर विद्यार्थ्यांना अनेक संधी उपलब्ध असल्याचे सांगत विविध अभ्यासक्रमाबद्दल माहिती दिली. तसेच एमआयटी एडीटी विद्यापीठात ऍडमिशनसाठी असलेले निकष यावेळी समजून सांगितले. ते म्हणाले, "विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीच्या क्षेत्रात करियर करून नावलौकिक मिळवावे. तुम्ही वेळेचे नियोजन करून अभ्यास करा, यामुळे चांगले गुण मिळवण्यास मदत होईल.




त्याचप्रमाणात अभ्यास करताना रिव्हिजन सुरु ठेवा. काही विद्यार्थी परीक्षेच्या एक दिवस अगोदर रिव्हिजन करतात, मात्र तुम्ही पाहा, जे टॉपर विद्यार्थी आहेत, त्यांची अभ्यास करण्याची पद्धत आणि आपली पद्धत कशी आहे. तसेच विद्यार्थ्यांनी बारावी नंतर कोणते अभ्यासक्रम निवडावे? कोणते महाविद्यालय निवडावे? या बद्दल माहिती देत प्रवेश परीक्षेसंदर्भात मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना माळवडे यांनी काही सोप्या पद्धतीने स्टेप नुसार विद्यार्थ्यांना समजून सांगितले. यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी प्रश्नोत्तरे करीत आप-आपली समस्या मांडली, या समस्येचे निवारण उल्हास माळवदे यांनी केले.

यावेळी बोलताना डॉ. नंदकिशोर कार्लेकर म्हणाले, "तुम्ही तुमच्या करिअरचा मार्ग ठरवत असताना काही गोष्टी लक्षात ठेवा, मशीन कसे शिकतात, डेटा निर्णय कसा बदलतो किंवा मोबाइल ॲप्स लोकांचे जीवन कसे सुलभ करतात, या गोष्टींची आवड असेल तर तीच दिशा निवडा. स्पेशलायझेशन करा म्हणजे तुमच्या आवडीला दिशा द्या, ज्यात तुमची आवड असेल, तीच दिशा निवडा, याने तुमच्या करियरला योग्य वळण मिळेल.

प्रगत तंत्रज्ञान शिकण्यापूर्वी गणित, भौतिकशास्त्र आणि कोअर प्रोग्रॅमिंग या विषयांमध्ये तुमचा पाया मजबूत असावा. फक्त आजची नोकरी नव्हे, तर दीर्घकालीन दृष्टी ठेवा: आज जे तंत्रज्ञान शिकत आहात (AI, Edge Computing, Blockchain) ते पुढील दशकात जगाच्या मूलभूत प्रणालीचा भाग होणार आहे. म्हणून तुमचा करिअर फक्त 2025 साठी नव्हे, तर भविष्यासाठी घडवा.

सतत शिकत राहा: तंत्रज्ञान सतत बदलत असते. पहिल्या वर्षी शिकलेले तिसऱ्या वर्षी बदलू शकते. त्यामुळे सतत शिकण्याची वृत्ती ठेवा. विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमासोबत संशोधन सुविधा, उद्योग सहकार्य, मार्गदर्शन व प्लेसमेंट सहाय्य या गोष्टी देखील महत्त्वाच्या आहेत आणि एमआयटी एडीटी या बाबतीत सक्षम असल्याचे म्हंटले आहे.

# पहिलाच स्नेहमेळावा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

गुरूंचा आशीर्वाद व विद्यार्थ्यांचा उत्साह यामुळे भारावलेले माजी विद्यार्थी मित्र मैत्रिणींना बालपणाचा फिल अनुभवास मिळाला.सकाळी १०:३० वाजता आवारातच चहा, नाष्टा करून १०:५० ची शाळेची घंटा वाजताच सर्व विद्यार्थी वर्गात आपापल्या जागी स्थानापन्न झाले.सुरुवातीला राष्ट्रगीताने सुरुवात झाली त्यानंतर भगवंत डुंबरे व नितीन सोनवणे यांनी सर्व विद्यार्थ्यांची हजेरी घेतली.काहींनी उभे राहून हजर तर काहींनी प्रेझेंट म्हणत आपली उपस्थिती दर्शवली. नंतर वर्गातील दिवंगत २१ विद्यार्थी तसेच शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांना श्रद्धांजली वाहिली.त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांची मनोगते झाली.

एक वाजता शिक्षकांचे वर्गात आगमन झाल्यानंतर शिक्षकांच्या हस्ते शिवप्रतिमेला हार घालून दीपप्रज्वलन करण्यात आले.उपस्थित शिक्षकांमध्ये मुख्या. मु.ग.भोर, के.आर. तांबे,भालेराव सर,जी.आर. डुंबरे, आरोटे सर,सुशीला गावडे मॅडम,विश्वासराव तांबे संजय ढमढेरे यासह संस्थेचे अध्यक्ष अनिल तांबे, खजिनदार रघुनाथ तांबे, सचिव प्रदीप गाढवे तसेच पंकज घोलप,खाडे सर तसेच शिवनेरीचे शिलेदार नंदूशेठ भोर,राजू तांबे व रोहिदास शिंदे उपस्थित होते. दुपारी जेवणासाठी मासवडी,भाकरी,जिलेबीचा बेत ठेवण्यात आला होता.

गुरुजनांनी दिलेली शिकवण शिस्त व भावी वाटचालीसाठी केलेले संस्कार या जोरावर अनेक जण आज मोठ्या पदावरून निवृत्त झाले आहेत. त्यात अनिल औटी,लक्ष्मण डुंबरे,दिलीप घुमटकर,किशोरसिंग परदेशी,गोविंद डुंबरे,रमेश बटवाल,बबन गगे,मनोहर डुंबरे,आरिफ खान,परीक्षिती बटवाल,शिवाजी डुंबरे,जालंदर पानसरे, गणेश भिसे, यासह ६२ माजी विद्यार्थी उपस्थित होते.शाळेची घंटा, जनगणमन,हजेरी,मधली सुट्टी,मुलांनी एकत्र केलेले जेवण,बेंचवर बसण्याचा आनंद,पसायदान यासह बालपणीच्या भांडण मारामारीचाही अनुभव विद्यार्थ्यां नी घेतला. कार्यक्रमाचे नियोजन रवींद्र पाटील, सुभाष बोर्डे,अविनाश ठिकेकर,बाळासाहेब जंगम यांनी तर सूत्रसंचालन रवी येरंडे यांनी केले.





शहापूर : कृषी उत्पन्न बाजार समिती शहापूर आठवडी बाजारात शहापूर तालुक्यासह बाहेरील शेतकरी, व्यापारी व ग्राहक मोठ्या प्रमाणात येत असतात.मात्र याठिकाणी अनेक दुकाने व वाहने नियबाह्य पद्धतीने राष्ट्रीय महामार्गा लगत लागलेली असतात.यामुळे याठिकाणी अनेक अपघात होतात.भविष्यात याठिकाणी मोठा अपघात घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नंदकुमार डोहळे व उपसभापती शरद वेखंडे, शहापूरचे तहसीलदार परमेश्वर कासुळे,पोलिस निरीक्षक मुकेश ढगे व गोठेघर ग्रामपंचायत यांना एक निवेदनाद्वारे याठिकाणी अवैद्य रित्या दुकाने व वाहने पार्किंग केल्यास त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

## थोडक्यात बातम्या...

### "लास्ट स्टॉप खांदा'तून उलगडणार प्रेमाचा इमोशनल कॉमेडी ड्रामा




**नाशिक (स. गांवकरी) :** सध्या जोरदार चर्चेत असलेल्या 'लास्ट स्टॉप खांदा...' या चित्रपटातून प्रेमाचा इमोशनल, कॉमेडी ड्रामा उलगडणार आहे. उत्तम लेखन, अभिनय, संगीत असलेला, पुरेपूर मनोरंजन करणारा हा चित्रपट २१ नोव्हेंबरला प्रदर्शित होणार असून, चित्रपटाचा ट्रेलर लाँच करण्यात आला आहे. शिवम फिल्म क्रिएशन सिग्नेचर ट्यून्स, स्नेहा प्रॉडक्शन्स यांनी "लास्ट स्टॉप खांदा... " प्रत्येकाच्या प्रेमाची गोष्ट या चित्रपटाची निर्मिती केली आहे. सचिन कदम आणि सचिन जाधव यांनी या चित्रपटाती प्रस्तुती केली आहे. प्रदीप मनोहर जाधव हे या चित्रपटाचे निर्माते असून सचिन कदम, अमृता सचिन जाधव सहनिर्माते आहेत. श्रमेश बेटकर लिखित या चित्रपटाचं दिग्दर्शन विनित परुळेकरनी केलं आहे. चित्रपटात अभिनेता श्रमेश बेटकर अभिनेत्री जुईली टेमकर, निखिल बने, मंदार मांडवकर, शशिकांत केरकर, सुदेश जाधव, महेश कापरेकर, प्रियांका हांडे, डॉ. सचिन वामनराव, गणेश गुरव, निशांत जाधव, गिरीश तेंडुलकर, जयश्री गोविंद अशी तगडी स्टारकास्ट आहे. तर पाहुणे कलाकार म्हणून प्रभाकर मोरे, धनश्री काडगावकर, अशोक ढगे हे आपल्या भेटीस येणार आहेत. चित्रपटाचं छायांकन हरेश सावंत यांचं असून कलादिग्दर्शक केशव ठाकुर आहेत. संगीत श्रेयस राज आंगणे यांचे आहे, तर नृत्यदिग्दर्शन राहुल बनसोडे, रवी आखाडे यांचे आहे.

### सर्व जागा ठाकरे शिवसेना मोठ्या मताधिक्याने जिंकेल : योगिता नाईक



**ठाणे, दिवा (स. गांवकरी) :** ठाणे महानगरपालिकेची आरक्षण सोडत मंगळवारी जाहीर झाल्यानंतर प्रभाग क्रमांक २८ मधिल सर्व जागा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष मोठ्या मताधिक्याने जिंकेल असा ठाम विश्वास कल्याण ग्रामिण विधानसभा सांघटिका योगिता हेमंत नाईक यांनी व्यक्त केला. दिवा शहर हा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा बालेकिल्ला आहे. मागील निवडणुकीमध्ये उद्धव ठाकरे साहेबांच्या नेतृत्वात पक्षाने दिलेले आठ उमेदवार उद्धव साहेबांवर विश्वास ठेऊन दिवेकरांनी आठच्या आठ मोठ्या मताधिक्यांनी निवडून दिले परंतू कालांतराने त्या पैकी सात नगरसेवक वेगळे झाले. परंतू दिवा शहरात माझ्यासारख्या अनेक शिवसैनिकांनी पुढे येऊन पक्ष पुन्हा या दिवा शहरात मोठ्या प्रमाणात उभा केला व नागरिकांच्या अनेक अडचणी सोडवत राहिले. त्यामुळे आज पक्षाला मोठ्या प्रमाणात जनाधार निर्माण झाला आहे. त्यामुळे दिवा शहरातील नागरिक शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या प्रभाग क्रमांक २७ व २८ मधील आठच्या आठ उमेदवार मोठ्या मताधिक्याने निवडून देऊन दिवेकरांच्या समस्या सोडवण्यासाठी ठाणे महानगरपालिकेमध्ये नगरसेवक म्हणून पाठवतील असा ठाम विश्वास योगिता नाईक यांनी स्पष्ट केला आहे.

### गरीब नेतृत्व निवडणुकांपासून दुर जात आहे - सौरव आढांगळे



**ठाणे (स. गांवकरी) :** निवडणुकीच्या काळात पैश्याचा आणि सत्तेचा खेळ वाढतं चालला आहे. जनतेच्या प्रश्नावर काम करणारे प्रामाणिक सर्वसामान्य घरातील गरीब नेतृत्व या स्पर्धेत मागे पडत आहे.पुर्वी कामाच्या जोरावर, जनसेवेवर भर दिले जात होते.मात्र आता निवडणूकीत पैसा व ताकद याला महत्त्व दिले जाते.या सर्व गोष्टी मुळे प्रामाणिकपणे काम करणारे सेवाभावी नेतृत्व कुठं तरी मागे पडत आहे. सध्या ची राजकिय परिस्थिती पाहता आता बौध्दिक क्षमता आणि अभ्यास या गोष्टी कालबाह्य झाल्यातच जमा आहे.आता कार्यकर्ते यांनी निवडणूक लढवून जिंकणे हे स्वप्नच ठरणार आहे.आता जमाना पैसा,गुंडगिरी, रुबाब ,थाट,लौकिक,या गोष्टींचा आहे.आजच्या घडीला कार्यकर्त्यांचा वापर फक्त संख्याबळ व जमाव जमवून घोषणा देणे आणि नेत्याचे गुणगान करणे इतकाच राहिला आहे. पण हे चित्र लोकशाही आणि विकासाला घातक आहे. याचा विचार राजकिय पक्ष ही करतांना दिसत नाही. उमेदवारी देतांना बौध्दिक गुण बाजूला ठेवून पैसा हाच एक निकष लावला जातो. भविष्यात म्हणूनच कार्यकर्त्यांनी निवडणुका लढवणे हे आता स्वप्नच ठरणार आहे.मग लढायचे कोणासाठी...??असे स्पष्ट करत सौरव आढागले यांनी समाजाला जागरूक करण्याचे प्रयत्न केले आहे.

### डब्ल्यू. एच.ओ. च्या परिषदपूर्व अहवालात दिलासा देणारे संकेत

**पुणे (स. गांवकरी) :** जागतिक आरोग्य संघटनेच्या (डब्ल्यू. एच.ओ.) अकराव्या परिषदेला सुरुवात होण्याच्या पार्श्वभूमीवर प्रसिद्ध झालेल्या एका नव्या अहवालात भारतासाठी आशेचा किरण दिसून आला आहे. या अहवालानुसार, भारत इ.स. २०६० पर्यंत धूम्रपानामुळे होणाऱ्या अकाली मृत्यूपासून सुमारे ऐंशी लाख लोकांचे प्राण वाचवू शकतो. जगभरात तंबाखूचे सेवन हे अजूनही एक गंभीर आरोग्यसंकट ठरले आहे. दरवर्षी सुमारे ऐंशी लाख लोक धूम्रपानाशी संबंधित आजारांमुळे मृत्युमुखी पडतात.

# लतिफ राजे यांनी आपला वाढदिवस साजरा केला अत्यंत साध्या पद्धतीने

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

आजच्या आधुनिक युगात वाढदिवस म्हटला की, मित्रांसोबत पार्टी करणे, मौजमजा करणे आणि अमर्याद खर्च करणे अशी एक सर्वसाधारण धारणा झाली आहे. मात्र या प्रस्थापित संकल्पनेला छेद देत आणि समाजासमोर एक नवा आदर्श ठेवत, पारनेर तालुक्यातील ढवळपुरी येथील प्राथमिक आश्रमशाळेतील एका शिक्षक लतिफ राजे यांनी आपला वाढदिवस अत्यंत साध्या पद्धतीने साजरा केला आहे.

ढवळपुरी येथील प्राथमिक आश्रमशाळेत शिक्षक म्हणून कार्यरत असलेले आणि 'सृष्टीमित्र परिवाराचे संस्थापक' असणारे शिक्षक लतिफ राजे यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त कोणताही फाजील खर्च न करता आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना विविध फळझाडांच्या रोपांचे वाटप केले. निसर्गाप्रती आपली कृतज्ञता व्यक्त करणारा आणि भावी पिढीला पर्यावरणाचे महत्त्व समजावणारा हा उपक्रम खऱ्या अर्थाने प्रेरणादायी ठरला. 'वाढदिवस माझा – आनंद तुमचा' या स्तुत्य उपक्रमांतर्गत आपला ५१ वा वाढदिवस साजरा केला. यावेळी त्यांनी शाळेतील राष्ट्रीय हरित सेनेतील विद्यार्थ्यांसह इतर विद्यार्थ्यांना झाडांचे आणि पर्यावरणाचे महत्त्व अत्यंत सोप्या भाषेत पटवून दिले. केवळ रोपांचे वाटप न करता या कार्यक्रमादरम्यान त्यांनी जलसंवर्धन (पाणी वाचवणे), ऊर्जा संवर्धन (वीज व इतर ऊर्जा स्रोतांचा जपून वापर), आणि कचरा व्यवस्थापन (टाकाऊ वस्तूंपासून उपयुक्त वस्तू बनवणे) यांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या विषयांवर मार्गदर्शन केले. सध्या जागतिक स्तरावर पर्यावरणाची समस्या गंभीर होत असताना, शालेय विद्यार्थ्यांमध्ये या विषयांबद्दल जागृती निर्माण करणे हे काळाची गरज आहे, हे त्यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले.

याप्रसंगी आश्रमशाळेचे मुख्याध्यापक संदीप महांडुळे, शिक्षक वसंत काळे,राजाराम वाघ, संतोष पटटेकर, मनिषा गर्जे, रशिदा तांबोळी, भावना बेरड, अमोल बांगर, कृष्णा धुमाळ, सूरजसिंग वाणी, आप्पासाहेब वाबळे, देवका पायमोडे, प्रशांत पादीर, सुरेंद्र पाटील, समाधान भुसारे, सनी काळे, संदिप जाटे, रभाजी भागवत, गणेश लाकूडझोडे, अनिल गायकवाड, विठ्ठल बाचकर, संगिता मोरे आणि सोनाली नारायणे यांनीही या कार्यक्रमाला उपस्थित राहून सृष्टीमित्र लतिफ राजे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आणि त्यांच्या कार्याला प्रोत्साहन दिले.



### ५१ रोपांचे वाटप

आपल्या ५१ व्या वाढदिवसानिमित्त लतिफ राजे यांनी ५१ विद्यार्थ्यांना रोपांचे वाटप केले. यात चिंच, जांभूळ, आंबा, बहावा, लक्ष्मीतरू आणि कडीपत्ता यांसारख्या उपयुक्त आणि औषधी झाडांच्या रोपांचा समावेश होता. प्रत्येक विद्यार्थ्याला रोप देऊन त्याला त्याची काळजी घेण्याची जबाबदारी दिली. या सुंदर उपक्रमानंतर उपस्थित असलेल्या सर्व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटपही करण्यात आले. उपस्थितांची मांदियाळी लतिफ राजे यांच्या या पर्यावरणस्नेही उपक्रमाचे उपस्थित शिक्षकांनी कौतुक केले.

# २० नोव्हेंबरपासून iQOO १५ साठी प्री-बुकिंगची घोषणा

**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**

उच्च-कार्यक्षमता असलेला स्मार्टफोन ब्रँड, iQOO 26 नोव्हेंबर रोजी iQOO 15 लाँच करण्यासाठी सज्ज आहे. स्मार्टफोन इनोव्हेशनमध्ये नवीन मानके स्थापित करत, iQOO 15 प्रीमियम कामगिरीसह प्रगत कॅमेरा, सॉफ्टवेअर क्षमता आणि AI क्षमता, एक आकर्षक डिझाइन, विस्तारित बॅटरी लाइफ आणि इमर्सिव्ह डिस्प्ले तंत्रज्ञानाचा मेळ घालते जे एक अतुलनीय स्मार्टफोन अनुभव प्रदान करते.




iQOO 15 ची प्री-बुकिंग २० नोव्हेंबर २०२५ पासून सुरू होईल. ग्राहक त्यांचा फोन प्री-बुक करण्यासाठी १००० रुपये परत करण्यायोग्य रक्कम देऊन प्रायोरिटी पास मिळवू शकतात. प्रायोरिटी पाससह, तुम्हाला विशेष प्री-बुकिंग फायदे देखील मिळतील, ज्यामध्ये iQOO TWS 1e इयरबड्सची एक मोफत जोडी आणि १२ महिन्यांची वाढीव वॉरंटी समाविष्ट आहे. प्रायोरिटी पास मर्यादित आहेत आणि प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर दिले जातील.

# महिरावणीचा साईराम व्यवहारे राज्यस्तरीय कराटे स्पर्धेसाठी निवड!

- **विभागीय स्पर्धेत मातोश्री गि. दे. पाटील विद्यालयाची दमदार कामगिरी**

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यावतीने आयोजित नाशिक विभागीय शालेय कराटे स्पर्धा २०२५–२६ नुकत्याच मीनाताई ठाकरे स्टेडियम, हिरावाडी, पंचवटी, नाशिक येथे उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेत विभागातील जिल्ह्यांतील गुणवंत खेळाडूंनी सहभाग नोंदवला. या स्पर्धेत महिरावणी येथील मातोश्री गिताबाई देवराम पाटील माध्यमिक विद्यालयाचा विद्यार्थी कुमार साईराम ज्ञानेश्वर व्यवहारे याने आपल्या उत्कृष्ट खेळकौशल्य, आत्मविश्वास आणि मेहनतीच्या जोरावर १७ वर्षाखालील ४५ किलो वजनी गटात राज्यस्तरीय कराटे स्पर्धेसाठी निवड मिळवून संपूर्ण विद्यालय, गाव आणि तालुक्याचा मान उंचावला आहे.




साईरामला या यशस्वी प्रवासात विद्यालयाचे उपशिक्षक बाळासाहेब सोनवणे सर यांचे मोलाचे मार्गदर्शन तसेच प्रशिक्षक दीपक कनोजिया यांचे काटेकोर प्रशिक्षण लाभले.त्यांच्या प्रेरणेमुळे साईरामने विभागीय पातळीवर उत्कृष्ट लढत देत प्रतिस्पर्ध्यांवर विजय मिळवला. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल साईरामचे आणि मार्गदर्शक शिक्षकांचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) प्रशांत दिग्रसकर, जिल्हा क्रीडा अधिकारी सुनंदा पाटील, क्रीडा अधिकारी अरविंद खांडेकर, तसेच संस्थेचे अध्यक्ष मुरलीधर पाटील, जिल्हा कराटे असोसिएशन अध्यक्ष रमेश भडांगे,विद्यालयाचे मुख्याध्यापक अशोक भदाणे, संस्थेचे पदाधिकारी, शिक्षकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, ग्रामस्थ व माजी विद्यार्थी यांनी अभिनंदन केले.

# आदर्श ज्योतिष पुरस्काराने नगरचे तुषार घाडगे सन्मानित

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

पुणे येथील गौरी कैलास ज्योतिष संस्थेच्या वतीने आयोजित वार्षिक ज्योतिष महोत्सवात अहिल्यानगरचे भिंगार येथील प्रख्यात ज्योतिषीचार्य तुषार घाडगे यांना आदर्श ज्योतिष पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुण्यातील या ज्योतिष महोत्सवात देशभरातील नामवंत ज्योतिषी, वास्तुशास्त्रज्ञ, संशोधक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अहिल्यानगर मधील भिंगार येथील रहिवाशी प्रसिद्ध ज्योतिषीचार्य तुषार घाडगे यांना या महोत्सवात नाशिक येथील ज्योतिषी अतुल शास्त्री भगरे गुरुजी यांच्या हस्ते स्मृतीचिन्ह, शाल, श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले.




याप्रसंगी प्रमुख अतिथी अनिल चांदवडकर, विजय जकातकर,वेदमूर्ती पं.नंदकुमार जोशी, नाशिक येथील ज्योतिषी,पंढरपूर येथील श्री. विठ्ठल रुक्मिणी मंदिराचे विश्वस्त, झी मराठी वाहिनीवरील वेध भविष्याचा कार्यक्रमात सहभाग असणारे अतुलशास्त्री भगरे गुरुजी,डॉ.सौ. जयश्री बेलसरे, कैलास केंजळे, गौरी केंजळे,रमेश पलंगे, दिलीप अवस्थी, पुष्पलता शेवाळे, मान्यवर व्यक्ती मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अहिल्यानगर मधील सामाजिक, राजकीय,नैसर्गिक आपत्ती याबाबत अनेक भाकिते तुषार घाडगे यांनी सांगितले होते. ते खरे ठरल्याने या महोत्सवात त्यांना आदर्श पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# देशातील सर्वात मोठा पेट फेस्टिव्हल 'पेट फेड 2025' 22-23 नोव्हेंबर रोजी

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

देशातील सर्वात मोठा पेट फेस्टिव्हल – पेट फेड – आपल्या 11व्या पर्वासह पुन्हा एकदा भव्यतेने परतला आहे. सलग दुसऱ्या वर्षी पुणे शहरातून या पर्वाची सुरुवात होत असून, हा उत्सव 22 आणि 23 नोव्हेंबर 2025 रोजी डेक्कन कॉलेज ग्राउंड, पुणे येथे पार पडणार आहे. यंदा हा अनुभव अधिक मोठा, आकर्षक आणि "पॉसम" ठरणार आहे.



रॉयल कॅनिन, ड्रूल्स आणि बोलर्स यांच्या सहकार्याने आयोजित पेट फेड 2025 देशातील चार प्रमुख शहरांमध्ये – पुणे, दिल्ली, बेंगळुरू आणि मुंबई – होणार आहे. मानव आणि त्यांच्या पाळीव प्राण्यांमधील अनोखा बंध साजरा करण्यासाठी हजारो प्राणीप्रेमी एकत्र येणार आहेत.

# शिक्षक कॉलनी प्राथमिक शाळेस पालकांकडून एक लक्ष रुपयांचे शैक्षणिक साहित्य

**पाथर्डी : (समर्थ गांवकरी)**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिक्षक कॉलनी येथे नुकताच ग्रामस्थ पालक मेळावा ग्रामपंचायत माळी बाभूळगावचे सरपंच अनिल तुजारे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. कार्यक्रमासाठी गटशिकाधिकारी शिवाजी कराड, श्री रामनाथ कराड, मा. सरपंच विजय बोरुडे, ग्रामपंचायत सदस्य किशोर चव्हाण, आकाश वारे, सुनिता जाधव, ग्रामस्थ, पालक महिला मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या. यावेळी सरपंच अनिल तुजारे यांनी शाळेच्या गुणवत्ता विकास बाबत समाधान व्यक्त करून शाळेस निधी कमी पडू देणार नाही, असे आश्वासन दिले. गटशिक्षण अधिकारी श्री शिवाजी कराड म्हणाले की, तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेची पटसंख्या वाढत असून पालकांनी आपल्या पाल्यास जिल्हा परिषदच्या शाळेत पाठवण्याचे आवाहन केले, शिक्षण विस्तार अधिकारी रामनाथ कराड यांनी जिल्हा परिषदचे मुख्यकार्यकारी अधिकारी, प्राथमिक शिक्षणाधिकारी यांनी गेली दोन वर्षापासून सुरू केलेल्या मिशन आपुलकी, मिशन आरंभ या उपक्रम ची माहिती देऊन शाळेच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी शिक्षकांना आवाहन केले. या वर्षी नव्याने प्रारंभ झालेल्या चौथी शिष्यवृत्ती परीक्षासाठी किमान चार विद्यार्थी गुणवत्ता यादी मध्ये आणण्यासाठी शिक्षकांनी विशेष जादातासा सह प्रयत्न करण्याचे आवाहन केले. मिशन आपुलकी अंतर्गत पालक ग्रामस्थ यांनी मोठ्या प्रमाणात शैक्षणिक साहित्य देण्याचे आवाहन केले.



या प्रसंगी विजय बोरुडे,अशोक तुपे , सुनिता जाधव, आकाश वारे, किशोर चव्हाण यांनी या प्रसंगी मनोगत व्यक्त केले.या वेळी शाळेस खलील मान्यवर ग्रामस्थ यांनी एक लक्ष रुपयांचे विविध शैक्षणिक साहित्याचे लोकार्पण केले.ग्रामपंचायत सदस्य किशोर चव्हाण यांनी हार्मोनियम,काशिनाथ कारखेले यांनी कॉम्प्युट, टेबल व ३८स्कुल बॅगा दिल्या. अभ्यासक्रम वर्गणीहाय कॉम्प्युटर मध्ये लोड करून दिला. संगीता बुधवंत /आव्हाड यांनी साऊंड सिस्टिम,अशोक तुपे यांनी १२ स्कुल बॅगा, वही , पेन, कंपास पेटी दिल्या.ग्रामपंचायत सदस्या सुनीता मोहन जाधव व आकाश वारे यांनी दहा खुर्च्या व मॅट दिल्या. शशिकांत गायकवाड यांनी आपल्या मुलीच्या लग्नात सत्काराला फाटा देत ६० लेझीम दिले. एकूण एक लक्ष रुपयांच्या साहित्याचे लोकार्पण मान्यवरांच्या हस्ते झाले.

या कार्यक्रमासाठी ग्रामस्थ- पालक भाऊ पालवे, प्रमोद भावसार गुरुजी, भारत नन्नवरे गुरुजी, अशोक तुपे, व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अंबादास चव्हाण, संदिप खोटे, विजय बोरुडे, सोनाली बावणे, वर्षा उपाध्ये, चंद्रकात उदागे, सुरेखा शर्मा ग्रामस्थ- पालक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक बाबा जायभाये, सूत्रसंचालन श्रीमती संगीता आव्हाड यांनी केले तर आभार किशोर चव्हाण यांनी मानले.

# शुभांगी ताई मनोहर पोटे उमेदवारी

## शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल शिंदे

श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)

शिवसेना एकनाथ शिंदे पक्षाच्या नगराध्यक्ष पदाची उमेदवारी मावळत्या नगराध्यक्षा सौ.शुभांगी ताई मनोहर पोटे यांना जाहीर केल्याची घोषणा शिवसेना जिल्हा प्रमुख अनिल शिंदे यांनी श्रीगोंदा येथील रत्न मंगल कार्यालयात झालेल्या पक्षाच्या मुलाखती मध्ये केली. २ डिसेंबर रोजी होणाऱ्या श्रीगोंदा नगर परिषदेच्या जनतेतून नगराध्यक्ष आणि ११प्रभागातील २२ नगरसेवक पदासाठी बुधवारी जिल्हा प्रमुख अनिल शिंदे,संपर्क प्रमुख सचिन जाधव आणि दिलीप सातपुते, श्रीगोंदा कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती अतुल लोखंडे,माजी नगराध्यक्ष मनोहर पोटे, जिल्हा महिला आघाडी प्रमुख मीरा शिंदे, तालुका प्रमुख नंदकुमार ताडे,तालुका महिला आघाडी प्रमुख मीरा खेंडके आदींच्या उपस्थितीत मुलाखत



घेण्यात आली. मुलाखतीसाठी शिवसेना उबाठा चे जिल्हा उपप्रमुख बाळासाहेब दुतारे राष्ट्रवादीचे माजी उपनगराध्यक्ष अख्तर शेख, राजाभाऊ लोखंडे, सौ.सलमा पठाण सह सुमारे ७० जणांनी मुलाखत दिली इच्छुकांमध्ये माजी नगराध्यक्ष मनोहर पोटे,तालुकाप्रमुख नंदकुमार ताडे,जिल्हा महिला आघाडी प्रमुख मीरा शिंदे यांचाही समावेश आहे.

जिल्हा प्रमुख अनिल शिंदे यांनी सांगितले की मावळत्या नगराध्यक्षा सौ.शुभांगी पोटे यांनी व माजी नगराध्यक्ष मनोहर पोटे यांनी साडेसात वर्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या माध्यमातून श्रीगोंद्याचा काया पालट केल्याने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी श्रीगोंदा नगर परिषदेला कोट्यावधी रुपये विकासनिधी दिला.



भिवंडी : नागरिकांना मोफत आणि दर्जेदार आरोग्यसेवा देण्यासाठी, भिवंडी महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाने आज "लँडमार्क केअरर्स" आणि महानगरपालिकेच्या संयुक्त उपक्रमाने "मोबाइल मेडिकल युनिट (एमएमयू)" सेवा सुरू केली. या सेवेचे उद्घाटन आयुक्त अनमोल सागर यांनी केले.याप्रसंगी आयुक्त अनमोल सागर यांनी सांगितले की, भिवंडीतील नागरिकांना त्यांच्या दाराशी प्राथमिक आरोग्यसेवा प्रदान करणे हे आमचे ध्येय आहे. मोबाईल मेडिकल युनिटचा शुभारंभ हा या दिशेने एक मोठा टप्पा आहे. भिवंडी निजामपूर महानगरपालिकेने नागरिकांना "लँडमार्क केअरर्स" मोबाईल मेडिकल युनिट सेवेचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आणि त्यांच्या कुटुंबाच्या आणि समाजाच्या आरोग्याबाबत जागरूक राहण्याचे आवाहन आयुक्तांनी केले आहे.

## थोडक्यात बातम्या...



### अखिल भारतीय मराठा महासंघाच्या तालुकाध्यक्ष पदी लक्ष्मण लकी गोवर्धने

इगतपुरी (स. गांवकरी) : इगतपुरी तालुक्यातील सांजेगाव येथील सामाजिक कार्यकर्ते व राष्ट्रवादी कॉँग्रेसचे युवा नेतृत्व लकी लक्ष्मण गोवर्धने यांची अखिल भारतीय मराठा महासंघ इगतपुरी तालुकाध्यक्ष पदी निवड करण्यात आली आहे. जिल्हाध्यक्ष चंद्रकांत बनकर यांच्या हस्ते गोवर्धने यांना पत्र देऊन नियुक्ती करण्यात आली आहे. तालुक्यात समाज संघटन, मराठा महासंघाचे संघटनात्मक कार्य, केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना विषयी समाजामध्ये जनजागृती करणे आदी सन्घटनात्मक कामे करण्यात यावी असे पत्रात नमूद केले आहे. दरम्याला लकी गोवर्धने यांचे इगतपुरी तालुक्यात सामाजिक काम हे चांगले असून अखिल भारतीय मराठा महासंघाच्या कार्यासाठी ते नेहमीच अग्रेसर राहतील असा विश्वास जिल्हाध्यक्ष चंद्रकांत बनकर यांनी व्यक्त केला आहे. गोवर्धने यांच्या निवडीचे स्वागत आमदार हिरामन खोसकर, ऍड, संदीप गुळवे, उदय जाधव यांच्यासह तालुक्यातील पदाधिकाऱ्यांनी केले.

### सौ. तृष्णा तोटरे व अवकाश पा. धुप्पेकर पंचायत समिती गाव भेटीला

नायगाव (स. गांवकरी) : प्रा मनोहर तोटर सर अवकाश पाटिल धुप्पेकर, आनंदराव पाटिल बावणे, परमेश्वर पा. धानोरकर, सुहास पाटील टाकळीकर यांनी नरसी सर्कल मधील भोपाळा गाव भेट दौरा नरसी सर्कलचे भाजपचे इच्छुक उमेदवार सौ तृष्णा मनोहर तोटरे नरसी सर्कल मधील भोपाळा)येथील ग्रामस्थांशी स्नेह संवाद साधून गाठी-भेटी घेतल्या आणि आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने सकारात्मक चर्चा केली आणि खंबीरपणे पाठीशी उभे राहण्याचे आवाहन केले यावेळी समस्त गावकऱ्यांनी अतिशय जिव्हाळा जपत उत्स्फूर्तपणे स्वागत,सन्मान केला.यावेळी गावातील प्रमुख भाजपाचे कार्यकर्ते नरसी सर्कल मधील सर्व सहकारी,ग्रामस्थ मोठया संख्यने उपस्थित होते. जनता_माझी_मी_जनतेचा स्नेहसंवाद आपली च्या माणसासाठी हितगूज करण्यात आले.

### श्री वाणी विद्याशाला हायस्कूल कल्याण संघ रोलबॉल स्पर्धेत विजयी!

ठाणे-कल्याण (स. गांवकरी) : कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्रीडा व सांस्कृतिक विभाग अंतर्गत, उपायुक्त यांचा आदेशानुसार व क्रीडा पर्यवेक्षक प्रवीण कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हास्तरीय रोलबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.या स्पर्धेत श्री वाणी विद्याशाला हायस्कूल कल्याण ने पुन्हा एकदा आपली क्रीडा कौशल्ये प्रदर्शित करत, जिल्हास्तरीय रोलबॉल स्पर्धेत विजेतेपद पटकावले आहे! शाळेच्या 14 वर्षांखालील मुलांच्या आणि मुलींच्या दोन्ही संघांनी विजेतेपदाचा मान मिळवला असून, आगामी विभागीय स्तरीय स्पर्धेत त्यांनी आपले स्थान निश्चित केले आहे. 17 वर्षांखालील मुलींच्या संघाने उत्कृष्ट कौशल्य दाखवत उपविजेतेपद पटकावले, तर 17 वर्षांखालील मुलांच्या संघाने कौतुकास्पद तिसरे स्थान मिळवले. साउथ इंडियन असोसिएशनच्या कौन्सिल सदस्यांनी, मुख्याध्यापिका श्रीमती अंजना रेड्डी, पर्यवेक्षक श्री गजानन वाघ, क्रीडा शिक्षक आतिश ठाणगे, शमहेश पवार आणि शिक्षिका श्रीमती वर्षा पद्मन यांच्यासह सर्व विजयी संघ आणि सहभागी स्पर्धकांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. हे उत्कृष्ट यश विद्यार्थ्यांची कठोर मेहनत, समर्पण आणि खेळाडूवृत्तीचा पुरावा आहे. तसेच राष्ट्रीय रोल बॉल संघटना सचिव श्री प्रताप पगार, कल्याण डोंबिवली क्रीडा समिती सदस्य व अग्रवाल कॉलेज चे क्रीडा संचालक डॉ विजय सिंग, अनिकेत वानखेडे, प्रणव गायकर,यांच्यासह सर्व क्रीडा संघटक यांनी विजयी संघाचे व शाळेचे हार्दिक अभिनंदन आणि कौतुक केले.

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज विविध विकास कामांचे भूमीपूजन

नाशिक (स. गांवकरी) : नाशिक- त्र्यंबकेश्वर येथे २०२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यानिमित्त होणाऱ्या विविध विकास कामांचे भूमीपूजन आज गुरुवार १३ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी १२ वाजता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. एकूण पाच हजार ६५७ कोटी रुपयांच्या विविध विकास कामांचा यात समावेश आहे. कुंभमेळ्यानिमित्त सुरू होणाऱ्या विविध विकास कामांमुळे नाशिक शहरासह जिल्ह्याच्या विकासाला चालना मिळणार आहे. या कामांमुळे जिल्ह्यातील पायाभूत सोयीसुविधा बळकट होऊन रोजगाराला चालना मिळणार आहे. ठक्कर मैदान, एबीबी सर्कल, त्र्यंबक रोड, नाशिक येथे हा कार्यक्रम होईल. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ, कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, उद्योग मंत्री उदय सामंत, पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, क्रीडा, युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास औकाफ मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, अन्न व औषध प्रशासन, विशेष साहाय मंत्री नरहरी झिरवाळ, विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचे अध्यक्ष सुहास कांदे यांची प्रमुख उपस्थित राहणार आहे. याशिवाय जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधींची विशेष उपस्थित राहील.

## मंगळूरमधील पट्टेरी वाघाचे छायाचित्र 'एआय' तंत्रज्ञानाची किमया; वनविभागाकडून नोटीस

जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)

जुन्नर तालुक्याच्या पूर्वेला असणाऱ्या मंगळूर गावच्या एका शेतात पट्टेरी वाघ आढळल्याचेछायाचित्र सोशल मीडियावर मंगळवार दि:-११ नोव्हेंबर रोजी व्हायरल झाले होते आधीच बिबट्याने तालुक्यात जबरदस्त दहशत वाढवलेली असून त्यातच या पट्टेरी वाघामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.सोशल मीडियावर टाकलेल्या छायाचित्रात पट्टेरी वाघ शेतात उभा असल्याचे दिसत आहे. दरम्यान हे छायाचित्र 'एआय'(कृत्रिम बुद्धिमत्ता) वापरून तयार केले असल्याचे स्पष्ट झाले आहे. मंगरूळ ता:-जुन्नर येथील रहिवासी नितीन लक्ष्मण मिंडे यांनी त्यांच्या मुलाला पट्टेरी वाघ दिसल्या चे व त्याचे छायाचित्र काढल्याचे



वृत्त स्थानिक यूट्यब चॅनेलवर सांगून मुलाखत दिली.याबाबतची माहिती जुन्नर वनविभागाला मिळताच त्या छायाचित्राच्या सत्यतेबाबत खातरजमा करण्यासाठी ओतूरचे वनपरिक्षेत्र अधिकारी चैतन्य कांबळे यांनी कर्मचाऱ्यां सह घटनास्थळी जाऊन परिसराची पाहणी केली.या वृत्ताच्या सत्यते बाबत संबंधितांकडे कसून चौकशी केली.त्यांनी सांगितले की,घराबाहेर काढलेले वाघाचे छायाचित्र 'एआय'वर टाकून पाहिले असता तो वाघच असल्याचे उत्तर 'एआय' द्वारे देण्यात आल्याचे जबाबात तसेच रेकॉर्ड केलेल्या व्हिडिओद्वारे वनविभागास सांगितले. खोटी माहिती पसरविल्याने संबंधितांना वनविभागाकडून नोटीस जारी करण्यात आली आहेत अफवा पसरविणे/लोकांमध्ये भीती निर्माण करणे, खोटी माहिती समाज माध्यमांवर प्रसारित करणे आदी कृत्ये ही भारतीय न्यायसंहिता २०२३ तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० मधील तरतुदिनुसार प्रति बंधित असल्याने त्याचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीस तीन वर्षापर्यंतच्या कारावासाची तसेच १ लाख रुपया पर्यंतच्या दंडाच्या शिक्षेची तरतूद असल्याचे वनविभागाने म्हटले आहे.

### बिबट्या दिसताक्षणी "ऑन दि स्पॉट शूट" करा

आज वनमंत्री गणेश नाईक यांनी पिंपरखेड येथील बिबट हल्ल्यात बळी घेलेल्या बोंबे कुटूंबाची भेट घेतली यावेळी बिबट्यांचे योग्य नियोजन कामीं पुणे जिल्हा व आहिल्यानगर जिल्ह्याला प्रत्येकी ११ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. पूर्वी असे हल्ले होत नव्हते ,ऊसाची शेती वाढली आणि बिबट्यांना आदिवास वाटू लागला.आजपर्यंत दोनशे पिंजरे आले आहेत अजून एक हजार पिंजरे येणार आहेत याशिवाय गुजरातमध्ये वनतारा च्या वनाधिकारी यांच्याशी संपर्क साधून बोलणी झाली आहेत लवकरात लवकर पकडलेले २० बिबटे ते घेऊन जातील आणि याशिवाय भारतातील इतर राज्यांना आवश्यक असल्यास त्यांनाही दिले जातील याशिवाय आफ्रिकेत सुद्धा काही बिबट्यांची मागणीनुसार पाठविले जातील आणि नसबंदीचा प्रस्ताव केंद्राकडे पाठविण्यात आला आहे या उपाययोजना तात्काळ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे कारण मानवाची सुरक्षा महत्वाची आहे मी या खात्याचा मंत्री बदनाम होण्यासाठी झालो की काय असा प्रश्न मला निर्माण झाला आहे. याशिवाय बळी गेलेला व्यक्ती पुन्हा आपण आणू शकत नाही मात्र त्या घरातील एका व्यक्तीला वनविभागात नोकरी देण्याचा विचाराधीन आहे. एका बिबट्याचा खात्मा केला आहे यापुढे वनविभागाने सतर्क राहणे गरजेचे आहे अशा घटना पुन्हा घडायला नको म्हणून बिबट्या दिसताच क्षणी ऑन स्पॉट शूट करा.

**-गणेश नाईक:-वनमंत्री महाराष्ट्र राज्य.**

## 'इमेजफोर्स' मालिकेचे अनावरण




पुणे : (समर्थ गांवकरी)

डिजिटल छपाई उपायांमध्ये आघाडीवर असलेल्या कॅनन इंडियाने आज आधुनिक कार्यस्थळांच्या गरजांसाठी तयार करण्यात आलेल्या नव्या 'इमेजफोर्स' मालिकेचे अनावरण केले. या मालिकेत रंगीत सी५१०० व कृष्णधवल ६१०० अशा दोन श्रेणी असून, या बहुउपयोगी यंत्रांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने चालणारी स्मार्ट देखभाल, सुरक्षित माहिती प्रणाली, मेघजोडणी (क्लाउड कनेक्टिव्हिटी), तसेच उच्च दर्जाची छपाई क्षमता अशी वैशिष्ट्ये आहेत. कॅनन इंडियाचे अध्यक्ष तोशियाकी नोमुरा यांनी सांगितले की, कार्यालयीन कामकाज झपाट्याने डिजिटल होत असताना अधिक चपळ, जोडलेली व सुरक्षित साधने आवश्यक ठरत आहेत. ग्राहकांना अशा तंत्रज्ञानाद्वारे सक्षम करणे हे कॅननचे ध्येय आहे, जे कार्यक्षमतेसोबत माहितीची सुरक्षितता आणि पर्यावरणपूरकता राखते.

## श्री शंभुकलश काव्यसंस्थेच्यावतीने पहिले राजयस्तरीय काव्यसंमेलन संपन्न

अहिल्यागनर : (समर्थ गांवकरी)

श्री शंभुकलश काव्यसंस्था व सामाजिक प्रतिष्ठान या संस्थेचे पहिले राज्यस्तरीय कवी संमेलन अहिल्यानगर येथे नुकतेच हॉटेल यश पॅलेस येथे पार पडले. या कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या उपस्थितीत दीप प्रज्वलन करून झाली. या संमेलनाचे उद्घाटक ज्येष्ठ साहित्यिक डॉ. संजय बोरुडे, संमेलनाध्यक्ष चंद्रकांत वानखेडे, स्वागताध्यक्ष नागेश शेलार,शब्दगंध चे संस्थापक सुनील गोसावी यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. या संमेलनाचे प्रमुख पाहुणे सुनील गोसावी ,जेष्ठ साहित्यिक, सुभाष सोनवणे, आनंदा साळवे , कवयित्री रंजनताई बोरा,



कवयित्री सुनीताताई वाळुंज, अध्यक्ष महादेव लांडगे यांच्या उपस्थितीत संपन्न झाले.

यावेळी उपाध्यक्ष संजय शेळके, सचिव बाळासाहेब घोरपडे, संस्थेचे संघटक अनिकेत औसरमल, सहसचिव विश्वेश्वर बोडखे, कार्याध्यक्ष श्री देविदास थोरात, प्रसिद्धी प्रमुख पत्रकार अक्षय विधाते यांनी विशेष परिश्रम घेतले.

संमेलनात राज्यभरातून मोठ्या संखेने साहित्यिक आले होते. डॉ. संजय बोरुडे व प्रा. चंद्रकांत वानखेडे यांनी साहित्या विषयी मार्गदर्शन केले. तसेच नागेश शेलार यांनी सर्व प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले. अत्यंत बहारदार सुत्रसंचलन नवनाथ पोकळे व देव थोरात यांनी केले. विश्वेश्वर बोडखे यांनी संमेलनात महत्वाची जबाबदारी पार पाडली. राज्यभरातून संमेलनात सहभागी होण्यासाठी निवृत्ती एकनाथ पाचपोर, विजय भद्रीगे, चंद्रकांत घाडगे, किशोर पांचाळ, संजय वसंत पातुरकर, संतोष वसंत तावडे, गोकुळ गायकवाड, दादासाहेब पठारे, शंकर शिंदे, अशोक उघडे, रुपचंद शिदोरे, डॉ. दत्ता ठुबे, चंद्रकांत नरटे, मोहन वाकचौरे, उमेश गोरे, वैजनाथ जाधव, दिव्या लोंढे, सारिका नळकांडे. अलका खोसे, संतोष स्वामी कपाळे, नाथकुमार घोलवाड, सुनिल थोरात, दशरथ बावस्कर, संभाजी दराडे, बाळासाहेब रोहोकले, नागोराव सोनकुसरे, बाबासाहेब ढोबळे, निवृत्ती महाराज कानवडे, शांतीलाल ननवरे, सार्थक बेडके, आशा लोंढे, सचिन चव्हाण, प्रा. मकरंद पाटील, एकनाथ पवार, सुनिल (महाराज) केकाण, डी. आर. बांगर, दिनेश चव्हाण कवींचा संमेलनात यांनी सहभाग घेतला होता.

## भिवंडीत खासदार निधीतून कोट्यावधी रुपयांच्या विकास कामांचे उद्घाटन!

भिवंडी : (समर्थ गांवकरी)

भिवंडी लोकसभा मतदारसंघाचे खासदार सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा यांच्या खासदार निधीतून भिवंडीतील सुमारे साडे तीन कोटी रुपयांच्या विविध २३ विकास कामांचे उद्घाटन मंगळवारी खा.म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आले.

ताडाळी कामतघर येथील ब्रह्मानंद नगर येथे गटर व रस्त्याच्या दुरुस्तीसाठी सुमारे ४० लाख रुपये निधी खासदार बाळ्यामामा यांनी दिला असून या कामाचे भूमिपूजन खा म्हात्रे यांच्या हस्ते



करण्यात आले.यावेळी माजी नगरसेवक निलेश चौधरी,हनुमान चौधरी, यशवंत चौधरी यांच्यासह ब्रह्मानंद नगर मधील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यानंतर शहरातील नवी वस्ती, रावजीनागर,आस बीबी चौक,एसटी स्टॅण्ड येथील शिया कब्रिस्थान दुरुस्ती,गुलजार नगर,पिराणी पाडा,जब्बार कंपाउंड,किडवाई नगर,गायत्री नगर,न्यु आझाद नगर भागातील गटर,पाथवेज,मशिदीसाठी पत्राशेड,पेव्हर ब्लॉक,कॉंक्रीट रस्ता व गटर बांधकाम अशा सुमारे २३ विकास कामांसाठी खा बाळ्या मामा यांनी सुमारे साडे तीन कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असून या विकास कामांचे उद्घाटन खा बाळ्या मामा यांच्या हस्ते पार पडले.

भिवंडीतील विकास कामांसाठी आपण सदैव तत्पर असून रखडलेल्या विकास कामांसाठी मनपा मुख्यालयात आयुक्त व कंत्राटदारांची संयुक्तीक विशेष बैठक बोलावून शहरात रखडलेली विकास कामे लवकरात लवकर मार्गी लावणाचा प्रयत्न करणार असून शहराला आणखी जास्त विकास निधी कशा प्रकारे आणता येईल यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करणार असून भिवंडी रोड रेल्वे स्टेशनपरिसरातील नादुरुस्त रस्त्याची दुरुस्थी करण्यासाठी तत्काळ रेल्वे प्रशासनाशी संपर्क साधून त्या रस्त्याची दुरुस्थी लवकरात लवकर करणार अशी प्रतिक्रिया खा.बाळ्या मामा यांनी यावेळी दिली.

## छत्रपती शिवाजीराजे ग्रामपंचायत अधिकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी प्रताप साबळे



### निवड होणे ही केवळ जबाबदारी नव्हे तर विश्वासाची पावती !



संस्थेच्या चेअरमनपदी निवड होणे ही केवळ जबाबदारी नव्हे तर विश्वासाची पावती आहे. संस्थेचा आर्थिक आणि सामाजिक विकास साधण्यासाठी आम्ही एकदिलाने कार्य करू. किशोर जेजुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली संस्था सहकाराच्या नव्या उंचीवर नेण्याचा आमचा निर्धार आहे.

**- प्रताप साबळे, नवनिर्वाचित चेअरमन**

कर्जत : (समर्थ गांवकरी)

अहिल्यानगर जिल्हा छत्रपती शिवाजीराजे ग्रामपंचायत अधिकारी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी कर्जत तालुक्यातील कोरेगाव येथील ग्रामपंचायत अधिकारी प्रताप साबळे यांची नुकतीच निवड झाली आहे. तसेच पतसंस्थेच्या व्हाईस चेअरमनपदी हरीश भालेराव (पारनेर) तर मानद सचिवपदी गोटीराम मडके (शेवगाव) यांची निवड करण्यात आली आहे.

ही निवड प्रक्रिया नगर तालुका उपनिबंधक कार्यालयातील वरिष्ठ लिपिक महेश पालवे यांच्या अध्यक्षतेखाली व पतसंस्थेच्या संचालक मंडळाच्या सभेत उत्साहात पार पडली.

या निवडीत महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी संघाचे जिल्हाध्यक्ष किशोर जेजुरकर यांच्या नेतृत्वाखाली पॅनलने सर्व सत्ता काबीज करत ऐतिहासिक विजय नोंदवला.

चेअरमन, व्हा.चेअरमन व मानद सचिव अशी सर्व महत्त्वाची पदे जिंकत जेजुरकर यांच्या नेतृत्वाला पुन्हा एकदा सर्वांचा एकमुखी पाठिंबा मिळाला.

या निवडीत राज्य कोषाध्यक्ष कुंडलिक भगत, रमेश राजे सुपेकर यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरली.

यावेळी राज्य कोषाध्यक्ष कुंडलिक भगत, किशोर जेजुरकर, जिल्हा उपाध्यक्ष उपेंद्र पोटे, जिल्हा सरचिटणीस पोपट रासकर, युवा नेतृत्व राहुल गांगर्डे, रावसाहेब अभंग, दास तीपोले, अभिजीत पिंपळे, सदानंद डोखे, श्रीकांत साळे, नवनाथ गोरे, अर्चना गुंड, सुधाकर पगारे, ज्ञानेश्वर सुर्वे, संतोष थिगळे, सुधीर उंडे, संतोष साबळे, प्रशांत सातपुते, ज्ञानदेव अडसुरे, सुरेखा लांडगे, संगिता परोडकर, संतोष खंडागळे, शिवाजी धांडे, अमोल बरबडे आदी उपस्थित होते..

सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार करून अभिनंदन करण्यात आले. व पुढील कार्यासाठी शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला.

# सुनिता भांगरेंच्या भाजप प्रवेशाने फरक पडणार नाही

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या तत्कालीन नेत्या सुनिता भांगरे यांनी नुकताच भाजपात प्रवेश केला. पण त्यांच्यासोबत आमच्या पक्षातील कोणीही कार्यकर्त्याने भाजपात प्रवेश केलेला नाही. यामुळे सुनिता अशोक भांगरे यांच्या पक्ष सोडून जाण्याने आमच्या पक्षाची राजकीय ताकद कमी होत नाही. उलट अकोले तालुक्यातील महायुतीतील घटक पक्षांतील नेते व पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्ते हे एकसंघ नसल्याचा दावा राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष अमित भांगरे यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत व्यक्त केला. मविआ घटक पक्षांतील शिवसेना (ठाकरे गट), काँग्रेस, माकप, भाकप व इतर मित्र पक्षांतील तालुकास्तरीय नेते आपल्या पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांसोबत एकत्रित एकसंघपणे कार्यरत आहेत. कोणत्याही परिस्थितीत अकोले तालुका पंचायत समितीवर मविआचा झेंडा फडकेल व जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद मविआकडेच राहिल,असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. गुरुवारी दुपारी १ वाजता शिर्डीतील एका हॉटेलमध्ये माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्तर अहिल्यानगर जिल्हा आढावा बैठक होणार आहे. या बैठकीस जिल्हाध्यक्ष संदीप वर्पे आले होते. त्यांनी बुधवारी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्ष पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांसोबत आढावा बैठक घेतली. यावेळी युवक जिल्हाध्यक्ष अमित भांगरे, अकोले तालुकाध्यक्ष सुरेश गडाख, जिल्हा उपाध्यक्ष राजेंद्र कुमकर, बाळासाहेब भांगरे, विकास बंगाळ, महेश तिकांडे, विनोद हांडे, उर्मिला राऊत उपस्थित होते. यावेळी मतदारांचे आभार मानण्यासाठी दौरा केला नसल्याबाबत अमित भांगरे व वर्पे यांना प्रश्न केला गेला. पण यावर दोघांनाही समाधानकारक उत्तर देता आले नाही. ते म्हणाले, ही निवडणूक झाल्यानंतर शासकीय यंत्रणेकडून मतदान प्रक्रियेत केलेल्या यांत्रिक गडबडी, मतदानातील घोळ, दुबार मतदार, यासर्व घडामोडी व त्याविरोधात उच्च न्यायालयात धाव घेणे, यात फारच वेळ गेला. त्यामुळे मतदारांचे आभार मानले नसल्याचे ते म्हणाले. अकोल्यात महायुती विरूद्ध मविआ अशीच निवडणूक होईल, असेही ते म्हणाले.





पालघर जिल्ह्यातील डहाणू चे माजी नगराध्यक्ष व राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)चे उपजिल्हाध्यक्ष रवींद्र फाटक यांनी आज शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला. रवींद्र फाटक हे जुने शिवसैनिक असून त्यांच्या प्रवेशाने डहाणूत शिवसेनेची ताकद अधिक वाढणार आहे. तसेच आगामी डहाणू नगरपरिषदेच्या निवडणुकीत याचा मोठा फायदा शिवसेनेला होईल. यावेळी शिवसेना पालघर जिल्हा संपर्कप्रमुख व माजी आमदार रवींद्र फाटक, पालघर जिल्हाप्रमुख कुंदन संखे, माजी उपनगराध्यक्ष राजू माच्छी उपस्थित होते.

## थोडक्यात बातम्या...

### नाशिकच्या चांदवड तालुक्यात आणखी एक शेतकऱ्यांनी जीवन संपवले !



- कर्जाच्या विळख्यात अडकलेल्या बजरंग मढे यांची बैलगोठ्यात आत्महत्या

**चांदवड (स. गांवकरी) :** शिंगवे (ता. चांदवड) येथील शेतकरी बजरंग नरहरी मढे (वय ४८) यांनी कर्जाच्या विवंचनेतून आणि सततच्या नापिकीच्या फटक्याने कंटाळून काल (दि. ११ नोव्हेंबर) सायंकाळी घराशेजारील बैलगोठ्यात गळफास घेऊन आत्महत्या केली.मढे यांच्या शेतात मागील दोन-तीन वर्षांपासून नापिकीचं सावट होतं. कोरडा व ओला दुष्काळ, वाढलेला शेती खर्च आणि विक्रीत होणारी घसरण यामुळे उत्पादन खर्चही निघेना. वडिलांच्या नावावर असलेले सोसायटीचे कर्ज फेडता आलं नाही, तर सलग दोन वर्ष नातेवाईकांकडून हात उसनवारीने पैसे घेऊन दोन मुलींची लग्नं केली.शासकीय योजनेतून २०२३-२४ मध्ये मंजूर झालेला बैलगोठा बांधण्यासाठीही त्यांनी मित्रपरिवाराकडून उसनवार रक्कम उभी केली होती; मात्र त्या योजनेचं अनुदान अद्याप मिळालेलं नाही. या सगळ्या आर्थिक ओझ्याने ते पूर्णपणे खचले होते. यावर्षी पुन्हा ओल्या दुष्काळाने पिके वाया गेल्याने त्यांच्या विवंचनेत आणखी भर पडली. अखेर काल सायंकाळी सुमारे पाचच्या सुमारास त्यांनी बैलगोठ्यात गळफास घेऊन जीवनयात्रा संपवली. बजरंग मढे यांच्या पश्चात वृद्ध आई-वडील, पत्नी, दोन विवाहित मुली आणि दोन मुले असा परिवार आहे. त्यांच्या मृत्यूने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. शेतकरी आत्महत्यांचे थैमान थांबवणार कोण? सरकारच्या योजना फक्त कागदावर आणि शेतकऱ्यांच्या आशा धुळीत... हे वास्तव आज पुन्हा एकदा शिंगवेच्या मातीने पाहिलं आहे.

### बजाज जनरल इन्श्युरन्स लिमिटेडकडून इन्श्युरन्स घोटाळ्याचा पर्दाफाश

**पुणे (स. गांवकरी) :** भारतातील आघाडीची खासगी जनरल इन्श्युरन्स कंपन्यांपैकी एक असलेल्या बजाज जनरल इन्श्युरन्स लिमिटेडने (पूर्वीची बजाज आलियान्झ जनरल इन्श्युरन्स कंपनी) बनावट थर्ड-पार्टी नुकसानभरपाईच्या दाव्याच्या आधारे ₹25 कोटींच्या मोटर ॲक्सिडेंट इन्श्युरन्स फसवणुकीचा यशस्वीपणे पर्दाफाश केला आहे. भूज येथील मोटर अपघात दावा लवाद (MACT) मध्ये सादर केलेली बनावट एफआयआर आणि दिशाभूल करणाऱ्या कागदपत्रांच्या माध्यमातून ही फसवणूक उजेडात आली. भारतीय दंडविधान संहिता आणि मोटर वाहन कायदा अंतर्गत साणंद पोलीस स्थानकात एफआयआर दाखल करण्यात आली होती. तक्रार दाखल केलेल्या कथित वाहनचालकाने असा दावा केला होता की, आपण (वाहनचालक) महिंद्रा झायलो हे वाहन चालवित असताना रस्त्यावर समोरुन अचानक कुत्रा आल्याने गाडी पलटली. तसेच त्याने तक्रारीत असे म्हटले होते की, गाडीतील सह-प्रवाशाला अपघातात जीवघेणी दुखापत झाली आणि त्याला साणंद सरकारी रुग्णालयात दाखल केले असता मृत घोषित करण्यात आले. यानंतर, मृतांच्या कायदेशीर वारसांनी भूज येथील MACT समोर ₹25 कोटींचा नुकसानभरपाईचा दावा दाखल केला होता. बजाज जनरल इन्श्युरन्सला न्यायालयाचे समन्स प्राप्त झाले होते. तसेच अंतर्गत चौकशीला देखील सुरुवात झाली होती. कंपनीने एफआयआर, चार्जशीट, पोस्ट-मॉर्टम रिपोर्ट, स्पॉट आणि चौकशी पंचनामा आणि वाहनाचे कागदपत्रे मिळविली. कंपनीला एफआयआर आणि सहाय्यक कागदपत्रे संशयास्पद वाटला. तसेच पूर्वनियोजित फसवणुकीचा भाग असल्याचा संशय आला. न्यायालयीन हस्तक्षेपाची गरज ओळखून, बजाज जनरल इन्श्युरन्सने माननीय गुजरात उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. न्यायालयाने आपल्या निकालात, अपघात प्रथमदर्शनी संशयास्पद असल्याचे निरीक्षण नोंदविले आणि या प्रकरणाचा पुन्हा तपास करण्यासाठी गुन्हे अन्वेषण विभागाच्या क्राईम ब्रँचच्या अंतर्गत विशेष तपास पथक (SIT) नेमण्याचे आदेश दिले.

# दैनिक समर्थ गांवकरी दिवाळी अंकाचे नानजीभाई ठक्कर यांच्या हस्ते प्रकाशन!



**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

हिंदुस्तानातील थोर समाजसेवक तथा दानशूर व्यक्तिमत्व शेठ नानजीभाई खेमजीभाई ठक्कर ठाणावाला यांच्या शुभहस्ते दैनिक समर्थ गांवकरी या वृत्तपत्राच्या दिवाळी अंकाचे प्रकाशन ठाणे येथील एन.के.टी. ग्रुप हॉल येथे संपन्न झाले.

या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून थोर समाजसेवक नानजीभाई ठक्कर ठाणावाला उपस्थित होते. यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, दैनिक समर्थ गांवकरीचे महाव्यवस्थापक संजय फुलसुंदर, समाजसेवक रमेशशेठ ठक्कर व थोर समाजसेवक रामजी पाटील यांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमात दिवाळी अंकाच्या प्रकाशना नंतर वक्त्यांनी दैनिक समर्थ गांवकरी या वृत्तपत्राने ग्रामीण भागातील प्रश्नांना न्याय देण्याचे केलेले कार्य व पत्रकारितेतील योगदान यावर भर दिला. समाजसेवक नानजीभाई ठक्कर यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, “सत्य, समाजहित आणि ग्रामीण विकासाची बाजू मांडणाऱ्या पत्रकारितेची आजच्या काळात अत्यंत गरज आहे. समर्थ गांवकरी हे त्याचे उत्तम उदाहरण आहे.”

या प्रकाशन सोहळ्याला विविध क्षेत्रातील मान्यवर, पत्रकार, समाजसेवक व वाचक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय फुलसुंदर यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. विश्वासराव आरोटे यांनी मानले.

दैनिक समर्थ गांवकरी दिवाळी अंक २०२५ – समाजमनाला स्पर्श करणारा विचारसंपन्न अंक ठरणार, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

# मनाला स्पर्श केलेल्या दयाळू कृत्यांना दिला उजाळा!

**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**

दयाळूपणा नेहमी मोठ्या अभिव्यक्तींमधून दिसून येत नाही, तर कधी-कधी लहान क्षणांमध्ये देखील त्याचा अनुभव मिळतो, ज्याची दीर्घकाळपर्यंत छाप पडते. वर्ल्ड काइण्डनेस डे निमित्त एण्ड टीव्ही कलाकार प्रियमवदा कांत (लतिका, घरवाली पेडवाली), गीतांजली मिश्रा (राजेश, हप्पू की उलटन पलटन) आणि रोहिताश्व गौड (मनमोहन तिवारी, भाबीजी घर पर है) यांनी त्यांच्या वास्तविक जीवनातील अनुभवांबाबत सांगितले, जेथे साध्या दयाळू कृत्याने त्यांना भावूक केले आणि ते कृत्य कायमस्वरूपी त्यांच्या स्मरणात आहे. आगामी मालिका घरवाली पेडवालीमधील प्रियमवदा कांत ऊर्फ लतिका म्हणाल्या मला आठवते, काही वर्षांपूर्वी मी माझ्या मित्रमैत्रिणींसोबत शिखरावर ट्रेकिंगला गेले होते. ते ठिकाण खूप लक्षवेधक होते, पण मला तेथील स्थानिकांची दयाळू वृत्ती खूप आवडली. मी त्यांना रस्त्याच्या जवळ-जवळ प्रत्येक कोपऱ्यावर उभे असलेले पाहिले.



# अगस्तीच्या माजी विद्यार्थ्यांकडून शालेय साहित्याची भेट

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

अकोले येथील श्री अगस्ती एज्युकेशन सोसायटी संचलित अगस्ती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय अकोले येथील सन 1980 च्या एस एस सी बॅचने आपल्या शाळेबद्दलचे ऋणानुबंध जपत आधुनिक तंत्रज्ञानाचे पाऊल ओळखत आठ उच्च प्रतीचे व्हाईट बोर्ड, स्कॅनर व प्रिंटर असे एकूण पन्नास हजारांचे शालेय साहित्य भेट म्हणून देण्यात आले. नुकतेच या बॅचने तब्बल 45 वर्षांनी एकत्र येत आपल्या विद्यालयात स्नेहमेळावा आयोजित करून आपल्या गतकाळातील अनेक आठवणींना उजाळा देऊन शाळेचे आपल्या जीवनातील ऋण व्यक्त करत शाळेचा बदललेला चेहरामोहरा पाहून अभिमानाने आपणही शाळेसाठी काहीतरी योगदान दयावे या उदात्त हेतूने आठ व्हाईट बोर्ड, स्कॅनर व प्रिंटर देत शाळेविषयी कृतज्ञतेची भावना व्यक्त केली.थोर स्वातंत्र्यसेनानी संस्थेचे संस्थापक सेक्रेटरी गुरुवर्य बा ह नाईकवाडी तथा बाबा तसेच संस्थेच्या भूतपूर्व सेक्रेटरी स्व दुर्गाबाई नाईकवाडी तथा आई यांनी केलेले समाज उपयोगी संस्कार आपल्याला आजही सार्वजनिक जीवनात अधिक मौल्यवान ठरत असल्याची भावना सर्वांनीच अनेक उदाहरणे देत व्यक्त केली.याच जाणीवेतून बदलत्या काळानुसार विद्यार्थ्यांना उपयोगात येणारे शालेय साहित्य देऊन मोलाचे काम त्यांनी केले. माझी शाळा, सुंदर शाळा असा संदेश यातून देत इतर माजी विद्यार्थी व विद्यालयातील विद्यार्थ्यांना यातून नक्कीच प्रेरणा मिळेल असे संस्थेचे कार्याध्यक्ष सतीश नाईकवाडी यांनी सांगितले तसेच त्यांनी या उपक्रमाचे कौतुक करत या बॅचने आपले दायित्व जपत बाबांनी स्वातंत्र्यसंग्रामानंतर बहुजनांच्या साठी सुरु केलेला ज्ञानदानाचा हा यज्ञ अखंड राहण्यासाठी असेच दातृत्व असणारे असंख्य विद्यार्थी बाबांच्या व आईच्या प्रेरणेने या विद्यालयासाठी भरीव करण्यासाठी नेहेमीच तत्पर असतात म्हणून या बॅच मधील सर्वांना त्यांनी धन्यवाद दिले.




# "सगळे बिबटे पकडून पिंजऱ्यात टाका म्हणजे आम्हाला अंगणात खेळता येईल..."

## देवठाण शाळेतील विद्यार्थ्यांचे वनविभागाच्या अधिकाऱ्यांना साकडे!

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

"लई वाघ(बिबटे) झालेत. वाघ पोरांना खातो. आम्हाला त्याची भीती वाटते. घरचे आम्हाला बाहेर खेळायला जाऊ देत नाहीत. तुम्ही सगळे वाघ पकडून पिंजऱ्यात टाका म्हणजे मग आम्हाला अंगणात खेळता येईल. लहान पोरांचे जीव जाणार नाहीत..."

अशा शब्दांत भीतीग्रस्त मुलांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. बिबट्याबाबत घडलेले प्रसंग, आलेले अनुभव मुलांनी सांगितले. जंगलातला अधिवास सोडून स्थलांतरित झालेल्या बिबट्याने मुलांचे खेळण्याचे हक्काचे अंगण कसे व्यापून टाकले आहे, हे चिमुकल्यांचे 'मनोगत' ऐकताना अधिकारी विस्मयचकित झाले होते !

देवठाण परिसरात बिबट्याच्या वाढत्या उपद्रवामुळे निर्माण झालेल्या भीतीच्या पृष्ठभूमीवर जिल्हा परिषदेच्या देवठाण येथील शाळेत वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी मुलांशी संवाद साधला. मुलांच्या शंकांचे निरसन करताना त्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली. योग्य खबरदारी घेतल्यास बिबट्याचे हल्ले टाळता येऊ शकतात, असा विश्वास अधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

अलीकडेच बिबट्याच्या हल्ल्यात एका लहान बालकाचा मृत्यू झाल्याने परिसरात संताप आणि भीतीचे वातावरण आहे. विशेषतः लहान मुलांच्या मनात बिबट्याबद्दल तीव्र दहशत असून ती या संवादातून प्रकर्षाने जाणवली.

या भीतीतून बाहेर काढण्याच्या आणि सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन करण्यासाठी वनपाल देविदास जाधव, विठ्ठल पारधी, वनरक्षक अंकुश काकडे आणि एकनाथ पारेकर या अधिकाऱ्यांनी मुलांशी संवाद साधताना त्यांना समजेल अशा भाषेत सविस्तर उत्तरे दिली.

शाळेतून घरी जाताना गटाने बोलत करत चालत जावे. सायंकाळी शाळा सुटल्यानंतर वस्तीवर परतल्यावर एकट्याने बाहेर न पडणे. कुत्री, मांजरे यांच्या आसपास खेळणे टाळणे. वस्तीवरून शाळेत येणे-जाणे गटाने करणे. अंधारात बाहेर पडताना टॉर्च/बॅटरी सोबत ठेवणे. शौचालय नसेल तर लघवी/संडासासाठी मोठ्यांना सोबत घेणे. घराभोवती गिन्नी गवत, ऊस, मका यासारखी झाडीदार पिके न लावणे. अचानक बिबट्या समोर आला तर दोन्ही हात वर करून स्थिर उभे राहणे आणि पळून न जाणे. अशा प्रकारच्या बिबट्याच्या हल्ल्यांपासून संरक्षणाविषयी महत्त्वाच्या सूचना दिल्या. बिबट्याच्या सवयी, भक्ष्य, दैनंदिन जीवनात उपयोगी पडेल असा जीवनोपयोगी धडा या संवादातून मुलांना शिकायला मिळाला.

वनपाल पारधी म्हणाले, "वृक्षतोड, जंगलाला आग लावणे, बिबट्याला भक्ष्य उपलब्ध नसणे यामुळे जंगलातून बिबट्याने मानवी वस्तीत स्थलांतर केले आहे. त्याला कुत्री, शेळ्या अशी सहज शिकार मिळते. असे असले तरी बिबट्या स्वभावत: माणसापासून दूर राहण्याचा प्रयत्न करतो. मात्र आपण काळजी घेतली नाही तर धोका वाढतो.

# नगराध्यक्षा कावरे यांनी शहराला परिवारासारखे जपावे - खासदार नीलेश लंके यांचे आवाहन

## पदग्रहण समारंभ उत्साहात

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

नवनिर्वाचित नगराध्यक्षा डॉ. विद्या कावरे यांनी पारनेर शहराला परिवारासारखे जपावे असे आवाहन खा.नीलेश लंके यांनी केले.पारनेर शहर हे तुमचा परिवार आहे. दररोज नगरपंचायतमध्ये या, लोकांच्या समस्या ऐका. चेहऱ्यावरील भाव पाहून नागरीकांच्या अडचणी ओळखा. शहरात फिरा, तक्रारी ऐका. कामामुळे पदाची प्रतिष्ठा वाढते. राजकारणात डोक्यात हवा जाऊ देऊ नका. पद जनतेसाठी असते, स्वतःसाठी नाही, असे खा.लंके म्हणाले. महाविकास आघाडीच्या डॉ. विद्या कावरे यांनी पारनेरच्या नगराध्यक्षपदी १७ पैकी ११ मते मिळवत विजय संपादन केला. बुधवारी नगरपंचायत कार्यालयात पदग्रहण समारंभात त्यांचा कार्यभार मोठ्या उत्साहात पार पडला. खा. नीलेश लंके हे यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. बाजार समितीचे सभापती किसनराव रासकर हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. डॉ. विद्या कावरे या ज्या प्रभागाचे नेतृत्व करतात त्याच प्रभागात थोर क्रांतीकारक सेनापती बापट यांचे स्मारक आहे. योगायोगाने त्यांच्या जयंतीदिनी डॉ. कावरे या पदभार स्विकारला . यावेळी बाजार समितीचे उपसभापती किसनराव सुपेकर, कान्हूरच्या सरपंच संध्या ठुबे, किशोर यादव, दादा शिंदे, चंद्रभान ठुबे, संदीप रोहोकले, दादा दळवी, अरूण पवार, डॉ. आबासाहेब खोडदे, चंद्रकांत कावरे, धोंडीभाऊ ठाणगे, वैभव गायकवाड, ॲड. पी.आर. कावरे, अमीत जाधव, बाळासाहेब नगरे, डॉ. सचिन औटी, सुभाष शिंदे, राजू शेख, ऋषीकेश गंधाडे, विजय भास्कर औटी, कारभारी पोटघन, बाजीराव कारखिले, सतीश भालेकर, सचिन गवारे यांच्यासह उपनगराध्यक्षा जायदा शेख, सुरेखा भालेकर, नितीन अडसूळ, अर्जुन भालेकर, योगेश मते, भूषण शेलार, सुप्रिया शिंदे, प्रियंका औटी, हिमानी नगरे, विद्या गंधाडे, नीता औटी यांच्यासह पारनेर शहरातील अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते. खा.लंके म्हणाले की,नगराध्यक्ष निवडणुकीदरम्यान घोडेबाजार करण्याचा प्रयत्न झाला. महायुतीकडून नगरसेवकांना अमिष दाखवली, फोन गेले, आर्थिक दबाव टाकला गेला. मात्र आमचे नगरसेवक विकले गेले नाहीत. त्यांनी निष्ठा पाळली. त्यामुळेच आज डॉ. विद्या कावरे नगराध्यक्षपदी बसल्या आहेत. फटाके विरोधकांनी आणले, हेलीपॅड तयार केले, पण विजय मात्र निष्ठावंतांच झाला, असा टोला त्यांनी लगावला. खा. लंके म्हणाले, राज्यातील हे सरकार सत्ता मिळवून बसले आहे. पण त्यांना वाटते की, त्यांनी खूप काही कमावले आहे. खरे सरकार असते तर राज्यभर आनंद दिसला असता. मात्र हे सुतक पडल्यासारखे बसले आहेत. लोकांच्या मनावर राज्य करणे हीच खरी सत्ता असते. पैशाने किंवा पदाने नाही, तर जनतेच्या प्रेमाने लोकनेतृत्व मिळते. राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष अर्जून भालेकर म्हणाले की, पारनेरच्या पाणी योजनेची फाईल अंतिम टप्प्यात आहे. ही योजना मुख्यमंत्री कार्यालयात प्रलंबित आहे. खासदार नीलेश लंके यांनी त्यासाठी ९९ टक्के पाठपुरावा केला आहे. प्रवरेच्या आदेशामुळे ही योजना मंजुर होण्यासाठी अडथळे येत आहेत. पण खासदार नीलेश लंके हेच ही योजना पूर्णत्वास नेणार आहेत असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला. पारनेर शहराची ७४ कोटी रूपये खर्चाची योजना का अडविली याचा जाब सरकारला विचारण्याच हिंमत तुमच्यात आहे का ? असा सवाल करून योगेश मते म्हणाले, १२ जून २०२३ रोजी नगरपंचायतने तांत्रीक मंजुरीसाठी ७३ लाख रूपये शासनाकडे जमा केले आहेत. तरीही ही योजना का अडविण्यात आली ? यांना काहीच करायचं शिल्लक राहीलं नाही. कारण नीलेश लंके व आम्ही सर्व नगरसेवक यांनी सर्व कागदपत्रांची पुर्तता केलेली असून केवळ श्रेयवादासाठी ही योजना अडविण्यात आल्याचा आरोप मते यांनी केला. खासदार नीलेश लंके यांनी थेट सभेतून स्फोटक आरोप करत सांगितले की, तालुक्यात किमान ५० हजार मतांची हेराफेरी झाली आहे. त्याचे ठोस पुरावे माझ्याकडे असून ते लवकरच जनतेसमोर सादर करणार आहे. त्यांनी विरोधकांना टोला लगावत स्पष्ट केले की, विधानसभेच्या निकालाने आनंदोत्सव साजरा करणाऱ्यांनी फार हुरळून जाऊ नये. यांद्यांतील फेरफार, ईव्हीएम घोटाळयांच्या माध्यमातून काहींचा विजय झाला असला तरी सत्य किती दिवस दडवणार ? जनतेसमोर हे सर्व उघडकीस येणारच आहे.

